दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२५९ गुरुवार,दि.२२ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-259 | Thursday, Dt.22 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# पूजा खेडकरला अटकपूर्व जामीन मंजूर

## पूजाने कोणताही मोठा गुन्हा केला नाही, सर्वस्व गमावले, तिला कुठेही नोकरी मिळणार नाही

नवी दिल्ली / प्रतिनिधी

वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी अटकपूर्व जामीन मंजूर केला. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने पूजाला तपासात सहकार्य करण्याचे आदेश दिले आहेत.

सुनावणीत सर्वोच्च न्यायालय म्हणाले - पूजाने कोणता मोठा गुन्हा केला? ती ड्रग माफिया किंवा दहशतवादी नाही. तिच्यावर खुनाचाही (कलम ३०२) आरोप नाही.न्यायालयाने पुढे म्हणाले - तुमच्याकडे अशी प्रणाली किंवा सॉफ्टवेअर असले पाहिजे जेणेकरून अशा प्रकरणांचा तपास वेळीच होईल. आता तिने सर्वस्व गमावले आहे, तिला यापुढे कुठेही नोकरी मिळणार नाही.

न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या- दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकरणात आधीच जामीन मंजूर करायला हवा होता. तथापि, दिल्ली पोलिसांच्या वकिलांनी जामिनाला विरोध केला. ते म्हणाले - पूजा तपासात सहकार्य करत नाही. तिच्यावर गंभीर आरोप आहेत.

पूजा खेडकरवर संघ लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी इतर मागासवर्गीय आणि अपंगत्व कोट्याअंतर्गत आरक्षण मिळविण्यासाठी फसवणूक केल्याचा आरोप आहे.

गेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, आतापर्यंतच्या तपासात काहीही ठोस निष्पन्न झालेले नाही. असे दिसते की या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले जात नाही.

सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली पोलिसांना विचारले की पूजाची आतापर्यंत चौकशी का करण्यात आली नाही? यावर उत्तर देताना पोलिसांनी सांगितले की, पूजा चौकशीदरम्यान सहकार्य करत नव्हती. तथापि, पूजाच्या वकिलाने पोलिसांचा दावा फेटाळून लावला आणि सांगितले की ती चौकशीसाठी उपलब्ध होती परंतु तिला चौकशीसाठी बोलावण्यात आले नव्हते.

सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाचा आदेश रद्द केला



सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाचा २३ डिसेंबर २०२४ चा आदेश रद्द केला होता. पूजाची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा म्हणाले होते की उच्च न्यायालयाच्या आदेशात काही टिप्पण्या आहेत ज्या खटला सुरू झाल्यावर पूजाविरुद्ध वापरल्या जाऊ शकतात. यावर खंडपीठाने यूपीएससी आणि दिल्ली सरकारला नोटीस बजावली होती.

पूजाचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळताना दिल्ली उच्च न्यायालयाने कडक टिप्पणी केली

# परळी आगारात नव्या दहा लालपरी!

## अजय मुंडे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते नव्या बस प्रवाशांच्या सेवेत रुजू

प्रतिनिधी @ परळी

परळी वैद्यनाथ मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असल्याने येथील एसटी महामंडळाच्या आगारात नव्या दहा लाल परी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या असून या बसेसचे युवक नेते अजय मुंडे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते व महामंडळाच्या अधिकारी -




कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पूजन करून लोकार्पण करण्यात आले. बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असलेल्या परळी आगारात ये - जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असल्याने येथे नवीन २० बसेसची मागणी धनंजय मुंडे यांनी केली होती. त्यापैकी महामंडळाच्या वतीने सध्या दहा नवीन बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत.


(उर्वरीत पान २ वर)


# अजित पवार कोत्या मनाचे, जवळ येऊनही शिवराज दिवटेला भेटले नाहीत

## मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक संतापले

प्रतिनिधी @ बीड

बीडमधील परळी येथे शुक्रवारी संध्याकाळच्या सुमारास शिवराज दिवटे या तरुणाला समाधान मुंडे आणि त्याच्या दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केली. या टोळक्याने त्याचे अपहरण करून त्याला डोंगराळ भागात नेले आणि बांबू व लाकडी दांडक्यांनी अमानुष





मारहाण केली. या घटनेमुळे बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या शिवराज दिवटे याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यातच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे आज (दि. १९) बीड दौऱ्यावर आहेत. त्यामुळे अजित पवार हे शिवराज दिवटेची घेणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, अजित पवार यांनी शिवराज दिवटे याची भेट न घेताच ते पुढील कार्यक्रमासाठी रवाना झाल्याने मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांनी संताप व्यक्त केलाय.

(उर्वरीत पान २ वर)

## देवगाव येथील पांडूरंग मुंडे याचं अल्पशा आजाराने बीड येथे दु:खद निधन

प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यातील देवगांव येथील रहिवाशी पांडूरंग साहेबराव मुंडे वय ४८ वर्षे याचे दि.२१ मे बुधवारी पहाटे बीड येथील सरकारी रुग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले ते ब-याच दिवशापासुन अल्पशा आजाराने त्रस्त होते.त्यांच्यावर बुधवारी सकाळी देवगांव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.पांडूरंग मुंडे यांच्या पश्चात एक मुलगी जावाई,एक



अविवाहीत मुलगा दोन बहीणी एक भाऊ अशा परिवार आहे.पांडूरंग मुंडे यांच्या अकाली निधनाने देवगांव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते होणार सन्मान

## जगद्विवेक प्रतिष्ठानकडे गुणवंतांनी नोंदणी करावी - विकास स्वामी, वैभव स्वामी

प्रतिनिधी @ बीड

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी ७५ टक्के पेक्षा अधिक गुण घेतले आहेत. अशा विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते यथोचित सत्कार करण्यात येणार आहे. सत्कारास पात्र असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांनी जगद्विवेक प्रतिष्ठानकडे संपर्क साधावा असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी आणि सचिव वैभव स्वामी यांनी केले आहे.

जगद्विवेक प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष आदर्श मुख्याध्यापिका शिवैक्य जगदेवी विवेक स्वामी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून प्रतिवर्षी वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते २५ जून रोजी सन्मानपत्र, पेन, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षी देखील २५ जून २०२५ रोजी बीड येथील स.मा. गर्गे भवन, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या जवळ, तुळजाई चौक,बीड येथे लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. या सत्कारास पात्र असलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी आपला मार्क्स मेमो, संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता तालुका जिल्हा पिन कोड सह, तसेच पासपोर्ट फोटो १० जून पर्यंत व्हाट्सअप नंबर ९४ २२ ७४ ४६ ०५ प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी यांच्या नंबर वर पाठवून नोंदणी करावी असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष विकास स्वामी, सचिव वैभव स्वामी, उपाध्यक्ष सौ वैशाली स्वामी, सहसचिव सौ रुपाली स्वामी, कार्याध्यक्ष सौ वनमाला स्वामी, समन्वयक सौ वर्षा स्वामी, सदस्य शशांक स्वामी, वेदांत स्वामी तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त विलास स्वामी, अशोक स्वामी, दिलीप स्वामी, प्रशांत स्वामी, सतीश स्वामी, नागेश स्वामी, राजेश स्वामी आदींनी केले आहे.

प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांना

(उर्वरीत पान २ वर)

# राज्यस्तरीय खरीप हंगाम आढावा बैठक

## शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी आधुनिक प्रयोग शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




प्रतिनिधी @ मुंबई

कृषी विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या 'महाविस्तार' या कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित पच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीविषयक संपूर्ण माहिती दिली जाणार असून शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी शासनाच्या सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. अनावश्यक बियाणे घेण्यासाठी शेतकऱ्यांवर सक्ती होत असल्यास त्या कंपनीवर कारवाई करण्यात यावी, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय खरीप हंगाम आढावा बैठकीचे यशवंतराव चव्हाण केंद्र येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना येणाऱ्या विविध अडचणींचा तसेच कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी केल्या जाणाऱ्या विविध उपाययोजनांचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री ड.माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री ड.आशिष जयस्वाल यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य मंत्री, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी थहेश्रश ष ींहश ऱ्रींशीपाशपीं र- ीरिलह घेतला आहे. त्याचप्रमाणे राज्यातही सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी एकत्रितपणे योजना राबवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि मदत करणे आवश्यक आहे. शेती क्षेत्रातील गुंतवणूक वाढवून उत्पादकता वाढविणे गरजेचे आहे. यामुळे शेतीमधील शाश्वतता देखील वाढेल. गरजेप्रमाणे शेती कशी करावी, आवश्यक तेवढेच पाणी आणि खतांचा वापर कसा करावा, याबाबत विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. सध्या १० हजार गावांमध्ये ग्री बिझनेस क्टिव्हीटी सुरू असल्याबद्दल समाधान व्यक्त करुन मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक तालुक्यात डिजिटल शेतीशाळा आयोजित करुन त्यात शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यावर भर द्यावा, असे सांगितले.

यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. याचा शेती क्षेत्राला कसा लाभ करुन घेता येईल, याबाबत कृषी विभागाने दक्ष राहण्याची सूचना करुन शेतकऱ्यांना बियाणे, खते यांची कमतरता भासणार नाही, याची दक्षता घेण्याचे आदेश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले. शेतकऱ्यांना सावकाराच्या पाशातून बाहेर काढण्यासाठी बँकांमार्फत पतपुरवठा करण्याबाबत उद्दिष्ट पूर्ण करुन घ्यावे. कंपन्यांकडून अनावश्यक बियाणे आणि खते खरेदी करण्याबाबत जबरदस्ती होत असल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, असे सांगितले. देशाच्या सकल उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा ११ टक्के आहे, तथापि यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या सुमारे ४५ टक्के आहे. त्यामुळे या क्षेत्राकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता प्रतिपादित करुन शेतीला शाश्वत करण्यासाठी ग्रीस्टॅक मधील माहिती उपयुक्त ठरेल, यासाठी यात अधिकाधिक शेतकऱ्यांची नोंदणी करुन घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

### शेतीसाठीच्या शासनाच्या योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी गरजेची-एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, भारत देश आणि महाराष्ट्र राज्य हे शेतीप्रधान असून, शेती हा आत्मा आणि शेतकरी आपला अन्नदाता आहे. खरीप हंगामाच्या शुभारंभाच्या निमित्ताने राज्यातील कृषी यंत्रणांनी पूर्ण तयारी केली आहेत. हवामान अनुकूल असले तरी हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाचे नियोजन अधिक जबाबदारीचे आहे. आधुनिक आणि सेंद्रीय शेतीवर भर देण्याची आवश्यकता असल्याचे सांगून शेतकरी समृद्ध होण्यासाठी, त्याचे उत्पादन आणि उत्पन्न वाढण्यासाठी गटशेतीला प्राधान्य देण्याची गरज

(उर्वरीत पान २ वर)

## अल्पवयीन मुलीचे अपहरण गुन्हा दाखल

प्रतिनिधी @ परळी

तालुक्यातील पांगरी येथे राहणाऱ्या मजुराच्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याप्रकरणी परळी वैजनाथ ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, कैलास

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# विज्ञानमहर्षी

प्रा. नारळीकर हे महाराष्ट्रातील पहिले 'सेलिब्रिटी शास्त्रज्ञ'! साठच्या दशकात त्यांच्याबद्दल असलेली कमालीची उत्सुकता त्यांच्या अखेरपर्यंत कायम होती. त्यांचे संशोधन, त्यांचे लेखन, त्यांची भाषणे आणि त्यांचे विज्ञानप्रसाराचे कार्य सतत समाजाच्या समोर राहिले असले, तरीही त्यांच्याबद्दल मोठे कुतूहल होते.

आयुष्यभर संशोधनाच्या काटेरी मार्गावरून चालत खगोलशास्त्राच्या विश्वात आपली मुद्रा उमटविणारे प्रा. जयंत नारळीकर यांच्या निधनाने महान खगोलशास्त्रज्ञ काळाच्या पडद्याआड गेला आहेच; परंतु स्वत:ला विज्ञानापुरता मर्यादित न करता संशोधकाच्या हस्तीदंती मनोऱ्यातून बाहेर पडून समाजाला विज्ञानाभिमुख करणारा तळमळीचा विज्ञानप्रसारक, मराठी साहित्यातील विज्ञानकथा-कादंबऱ्यांचे दालन समृद्ध करणारा सर्जनशील लेखक आणि साकल्याने विचार करणारा तत्त्वचिंतक, समाजशिक्षक हरपला आहे.

शास्त्रज्ञांच्या, विज्ञानप्रसारकाच्या, लेखक वा तत्त्वचिंतकाच्या कोणत्याही साचेबद्ध प्रतिमेत प्रा. नारळीकरांनी स्वत:ला मर्यादित करून घेतले नाही. ते बिनीचे संशोधक होते; परंतु त्यांची संशोधकाची प्रतिमा ही प्रयोगशाळेतच रमलेल्या शास्त्रज्ञाची नव्हती. त्यांच्यातील विज्ञानाचा प्रसारकही पुस्तकी नव्हता; तो समाजाच्या सर्व स्तरांत संचारणारा होता, शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी त्यांच्या भाषेत संवाद साधणारा होता. त्यांच्या विज्ञानकथांत विज्ञान होते आणि साहित्यमूल्यही. विज्ञानकथांच्या नावाने त्यांनी ना वैज्ञानिक संकल्पनांचा भडिमार केला, ना त्यांनी कधी सरधोपट कथेला विज्ञानाच्या चौकटीत बसविले. त्यांच्या विज्ञानकथा आणि कादंबऱ्यांतील साहित्यमूल्य बावनकशी सोन्यासारखे होते. थरारक कथा-कादंबरी वाचतानाचा आनंद त्यांचे विज्ञान साहित्य वाचताना मिळतो. लेखकांनी, शास्त्रज्ञांनी भूमिका घ्यायला हवी, असा आग्रह धरला जाण्याच्या आधीपासून ते भूमिका मांडत आले. विद्यापीठांत ज्योतिष शिकविण्याला विरोध करण्यापासून मातृभाषेतील शालेय शिक्षणाचा पुरस्कार करण्यापर्यंतच्या अनेक मुद्द्यांवर त्यांनी स्पष्ट भूमिका घेतली. प्रसंगी ते प्रवाहाच्या विरोधात राहिले; परंतु आपली भूमिका सोडली नाही. समाजजीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे नारळीकर हे खऱ्या अर्थाने विज्ञानमहर्षी होते.

प्रा. जयंत नारळीकर हे महाराष्ट्रातील पहिले 'सेलिब्रिटी शास्त्रज्ञ'! साठच्या दशकात त्यांच्याबद्दल असलेली कमालीची उत्सुकता त्यांच्या अखेरपर्यंत कायम होती. त्यांचे संशोधन, त्यांचे लेखन, त्यांची भाषणे आणि त्यांचे विज्ञानप्रसाराचे कार्य सतत समाजाच्या समोर राहिले असले, तरीही त्यांच्याबद्दल मोठे कुतूहल होते. सामाजिक क्षेत्रात राहूनही आणि परिणामकारक काम करूनही त्यात वाहवत न जाण्याचा मोठा गुण त्यांच्यात होता. त्यांच्या सर्व कार्यांना प्रसिद्धी मिळाली; परंतु ते स्वत: कधी प्रसिद्धीच्या मागे धावले नाहीत. त्यांचे संशोधन, पुण्यातील आयुका सारख्या ख्यातनाम संस्थेची निर्मिती, विज्ञानप्रसारासाठी त्यांचे नावीन्यपूर्ण उपक्रम आणि त्यांचे दर्जेदार साहित्य यांद्वारेच ते समाजासमोर आले. विश्वरचनाशास्त्र हा त्यांच्या संशोधनाचा विषय. तो आज अनेक कारणांमुळे चर्चेत आहे. मात्र, प्रस्थापित कल्पनांच्या मागे न जाता त्यांना आव्हान देत नारळीकरांनी विश्वाचे 'अनादि अनंत' असे रूप उलगडून दाखविले.

'महाजनो येन गत: स पंथा:' असे म्हणत प्रस्थापित कल्पनांचा पुरस्कार करणाऱ्या हजारांपैकी एक होण्याचे आकर्षण आपल्याला कधी नव्हते, असे खुद्द त्यांनीच म्हटले आहे. विश्वरचनाशास्त्र हा विषय आज वैज्ञानिक राहिला नसून, त्यात अवैज्ञानिक अटकळबाजी वाढल्याची खंत त्यांना होती. विज्ञान-तंत्रज्ञानाची घोडदौड सुरू असताना प्रत्यक्षात समाज आणि विज्ञान यांच्यातील दरी रुंदावत असल्याचे त्यांचे निरीक्षण होते. ती कमी करण्यासाठी ते स्वत: पुढे सरसावले होतेच; परंतु आपल्या सहकारी शास्त्रज्ञांनाही त्यांनी उद्युक्त केले होते.

## टि सी हरवला आहे..

धारूर तेलगाव प्रवासात विकास असांबर तोंडे रा सोनिमोहा ता. धारूर जि.बीड यांचा इयत्ता दहावीचा टी सी., मार्कमेमो हरवला आहे. सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क करा..मो ८७८८५४३६३६

# राष्ट्रीय कबड्डीपटू : मा. प्रभाकरभाऊ गिते



अकोला निकळक हे बदनापूर जि. जालना जिल्ह्यातील एक लहान खेडेगाव. बदनापूर पासून हाकेच्या अंतरावर असलेले. बहुतांश शेतकरी पार्श्वभूमी असलेले. उत्तम शेती करणारे अनेक शेतकरी या परिसरात आपला नावलौकिक ठेवून आहेत. आजही गावात एकत्र कुटूंब पद्धतीने जगणारे , वागणारे अनेक कुटूंब आहेत. गावात गिते, केकान, तांबे, मुंढे, खेडकर या आडनावाची माणसं आहेत. याच गावातील गिते कुळात नामवंत व ख्याती प्राप्त प्रगतशिल शेतकरी स्व. रखमाजी पा. गिते होऊन गेले. शेतीनिष्ठ शेतकरी. त्यांना पाच मुले व एक मुलगी होती. त्यापैकी सर्वांत थोरला मुलगा म्हणजे स्व. प्रभाकर भाऊ गिते. सर्व गाव व जिल्हयात ते परभू भाऊ गिते म्हणून प्रसिद्ध होते. ते एक कुशल संघटक, ध्येयवादी व विकास प्रेमी , प्रभावी वक्तृत्व व नेतृत्व असलेले अत्यंत धाडसी व कर्तबगार असे व्यक्तिमत्व होते. पिळदार शरिर, उंच बांधा, गोरेपान आणि प्रचंड करारी असा त्यांचा बाणा होता. देखणे व राजबिंडे व्यक्तिमत्व त्यांना लाभले होते. ते उत्तम कबड्डी पटू व अकोला गावचे अनेक वर्ष सरपंच होते. राजकीय, धार्मिक, सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग असे. मदतीला तत्पर धाऊन जाणे आणि अन्यायाच्या विरुद्ध उभे राहाणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळेच ते सर्वत्र लोकप्रिय होते. राजकीय क्षेत्रात त्यांचा दबदबा होता. अनेक राज्यस्तरीय , राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत त्यांनी पारितोषीके प्राप्त करून जालना जिल्हयाचा व आपल्या गावाचा नावलौकिक वाढविला होता. त्यांचा कबड्डी खेळ पहाण्यासाठी लोक गर्दी करत. त्यांना पकडणे शक्य नसे. सहा फुट उंच उडी मारून ते चढाई करीत. अतिशय चपळ ते खेळाडू होते. अंगात प्रचंड रग होती. अकोला येथील जि.प. शाळेत मिरजकर नामक शिक्षक त्या काळी होते. त्यांनीच अकोला येथे कबड्डीची परंपरा निर्माण केली. त्यातून अनेक खेळाडू घडले, नामवंत झाले त्यापैकीच एक कोहिनूर हिरा म्हणजे स्व. प्रभूभाऊ होते. प्रभू भाऊंनी अनेक कबड्डी पटू घडवले त्यांना प्रेरणा दिली. कबड्डी पटूंचे गाव म्हणून अकोला नि. आजही ओळखले जाते. ही ओळख त्यांनी व इतर खेळाडूंनी मिळवून दिली. गावात जय किसान क्रिडा मंडळाची स्थापना करून आदर्श घालून दिला. त्यातून प्रेरणा घेवून या परिसरात कबड्डी खेळांची समृद्ध परंपरा निर्माण झाली. ती आजही सुरू आहे. खेळ, शिक्षण आणि शेती हे त्यांच्या आस्थेचे विषय होते. साई समर्थ बहुउद्देशिय संस्थेची स्थापना करून त्यांनी आपल्या गावी साईबाबा माध्यमिक विद्यालय सुरू केले. आज हजारो विद्यार्थी त्यांच्या संस्थेत शिक्षण घेत आहेत. भाऊंचा सहवास व मार्गदर्शन मला विद्यार्थी असतांना लाभले होते. शिक्षणाची व कबड्डी ची प्रेरणा मला त्यांच्याकडून मिळाली होती. अकोला येथे त्यांच्या घरी मी दरवर्षी सुट्यात जात असे. सुशिक्षीत असे ते घराणे होते. माझ्या विषयी त्यांना खूप प्रेम व अभिमान होता.तसाच मलाही त्यांच्या विषयी. त्यांच्या मातोश्री स्व. कडताबाई गिते यांनी व भाऊंनी मला कायम आशिर्वाद दिले. असे आमचे स्नेही आमचे भाऊ म्हणजे आमचा अभिमान होते. एक राष्ट्रीय खेळाडू, उत्तम संघटक, आदर्श शेतकरी, आणि नामवंत सरपंच म्हणून ते कायम सर्वांच्या स्मरणात राहील. सरपंच असतांना त्यांनी आपल्या अकोला या गावी खूप मोठे विकास कामे केलीत. गावाला निश्चित अशी दिशा दिली. गावातील विद्यार्थी, युवक यांना प्रेरणा देवून विकासाच्या मार्गावर मार्गस्थ केले. त्यांचे अकोला पंचक्रोशिसह जिल्हाभरात फार मोठा मित्र परिवार होता. नातेसंबंध व मैत्री जपण्याचे प्रयत्न त्यांनी जिवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत केले. प्रभाकरराव गिते हे क्रिडा व राजकीय , सामाजिक क्षेत्रातले चालते बोलते विद्यापीठ होते. त्यांना मानणारा व ओळखणारा फार मोठा चाहता वर्ग सर्वत्र दिसून येतो. कुठेही राजकीय, सामाजिक कार्यक्रम असो की कौटुंबिक कार्यक्रम यात त्यांची उपस्थिती असायचीच. पिळदार शरिर, उंच बांधा, मजबूत शरिरयष्टी, भारदार व कणखर आवाज पांढरे शुभ्र कपडे, नेहरू शर्ट, धोतर, डोक्यावर गांधी टोपी प्रचंड सत्यवादी व परखड असे प्रभाकर भाऊंचे व्यक्तिमत्व होते. मी लहानपणी त्यांच्या घरी अनेकदा वेगवेगळ्या निमित्ताने जात असे. विशेषत: उन्हाळ्याच्या सुट्टीत मी आठपंधरा दिवस त्यांच्या कडे मुक्कामी असे. एकत्र कुटूंब असल्यामुळे त्यांच्या घरी मुलांचा फार मोठा गोतावळा असायचा. आम्ही सर्व मुले त्यांच्या शेतात दिवस रात्र पडलेले असायचो.एकत्र कुटूंबात वाढले जन्मले असल्यामुळे त्यांचे संस्कार त्यांच्यावर झाले. नकळत तेच संस्कार पुढच्या पिढीवर ही झाले. प्रभाकर भाऊंचे मला विशेष वाटायचे ते उत्तम कबड्डी पट्टू होते . त्यांची कबड्डी पट्टू म्हणून महाराष्ट्राला ओळख होती. त्यांच्याकडून उच्च शिक्षण व कबड्डीचे संस्कार व प्रेरणा मी घेतली. मलाही विद्यार्थी दशेत कबड्डीची आवड निर्माण झाली ती भाऊमुळेच. आजही त्या भागातील लोक त्यांच्या अनेक आठवणी सांगतात. असा माणूस आता त्या परिसरात होणार नाही.वाघाचे काळीज असलेले ते व्यक्तिमत्व आमच्यासाठी व हजारो क्रीडा प्रेमीसाठी कायम प्रेरणादायी आहे. प्रभाकरभाऊ गिते हे राष्ट्रीय कबड्डी पटू होते. एक उत्तम व आदर्श खेळाडू, प्रभावी वक्ते, कुशल संघटक, आदर्श ग्राम विकासाचे शिल्पकार, मैत्री जपणारे,संयुक्त कुटूंब पद्धतीचे प्रेरणास्थान, बंधूप्रेमी, गाव व समाजप्रेमी आणि राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मार्गदर्शक म्हणून त्यांची नोंद जालना जिल्ह्याच्या इतिहासात होईलच.

भाऊंच्या स्मृतिस विनम्र अभिवादन !

- प्रा. डॉ. शिवाजी हुसे

# अंबाजोगाई तालुक्यात शिक्षण संस्थेअंतर्गत होणारी प्रवेश प्रक्रिया गटशिक्षणाधिकारी

## कार्यालयाच्या अधिपत्याखाली पूर्ण करून डोनेशन घेणाऱ्या शाळेवर कारवाई करा

### अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**प्रतिनिधी @ अंबाजोगाई**

अंबाजोगाई तालुक्यात शिक्षण संस्थेअंतर्गत होणारी प्रवेश प्रक्रिया ही गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या अधिपत्याखाली पूर्ण करून डोनेशन घेणाऱ्या शाळेवर तात्काळ कठोर कारवाई करा अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी केली आहे. याबाबत अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे वतीने अंबाजोगाई येथील अप्पर जिल्हाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांना सोमवार, दिनांक १९ मे रोजी निवेदन देण्यात आले आहे.अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर (बाबा) यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनानुसार सोमवार रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अंबाजोगाई तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व खाजगी शाळेतून प्रवेशासाठी बऱ्याच शाळेतून पैशांची मागणी केली जाते व पैसे आकारणी केल्याशिवाय विद्यार्थ्यांना त्या संबंधित शाळेतून प्रवेश दिला जात नाही. तसेच प्रवेशावेळी डोनेशन म्हणून घेतलेल्या त्या पैशांची अधिकृत पावती ही दिली जात नाही. यामुळे पालकांची मोठी कुचंबना होत आहे. शिवाय कामात दिरंगाई पण केली जाते. आपल्या आदेशानुसार प्रत्येक शाळेमध्ये नोटीस बोर्डावर 'येथे डोनेशन घेतले जात नाही' असे दर्शनी भागावर ठळकपणे नोटीस लिहिण्यात यावी अशी विनंती ही निवेदनातून केली आहे. वास्तविक प्राथमिक शिक्षण कायदा २००९ नुसार कोणत्याही शाळेला कुठली ही फीस आकारता येत नाही, तरी ही अनाधिकृत फी (डोनेशन) वसूल करण्याची पद्धत शासन नियमानूसार सर्व इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या शाळांमधून बंद करावी व अशा शाळांची सखोल चौकशी करण्यासाठी गटशिक्षण अधिकारी यांनी एक समिती निवडावी व विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय द्यावा साहेबांनी या प्रकरणी लक्ष देऊन या समस्या सोडवाव्यात अशी सहकार्याची अपेक्षा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी गटशिक्षण




अधिकारी, गटशिक्षण कार्यालय अंबाजोगाई तसेच प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांना माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. या निवेदनावर अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख रणजित डांगे, हिंदूलाल आबा काकडे, बा.ह.शेरेकर, माऊली वैद्य, प्रशांत आदनाक, नानासाहेब धुमाळ, ओमकार चव्हाण, धनंजय सुरवसे, नानासाहेब गायकवाड, विजयानंद सोळंके, लहुजी शिंदे, शेख अकबर, दयानंद गुजर, सचिन राऊत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




## उप मुख्य कार्यकारी अधिकारी उदयसिंग राजपूत यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत भार्डी येथे

# एक दिवस गावकऱ्यासोबत ग्राम दरबार

**प्रतिनिधी @ जालना**

अंबड तालुक्यातील मौजे भार्डी ग्रामपंचायत येथे जिल्हा परिषद जालना चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग जालना चे उदयसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड पंचायत समिती अंतर्गत असलेले मौजे भार्डी ग्रामपंचायत मध्ये एक दिवस गावकऱ्यासोबत ग्राम दरबार उपक्रम घेण्यात आले आहे.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद जालना चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग तथा गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबड उदयसिंग राजपूत उपस्थित होते.यावेळी अंबड पंचायत समिती चे विस्तारधिकारी श्री व्ही.बी.बनाटे,श्री ए.ए.चव्हाण,श्री पी.जी.शिंगणे, सरपंच श्री नवनाथ तुकाराम डोईफोडे, उपसरपंच नासेर भाई, ग्रामपंचायत सर्व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी श्री वैराळ,पशू संवर्धन अधिकारी, आरोग्य अधिकारी,कृषी विभाग, स्वच्छ भारत अभियान विभाग, अंगणवाडी सुपरवायझर, सर्व अंगणवाडी सेविका, अशा सेविका मदतनीस,ग्राम पंचायत कर्मचारी व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पान १ वरून...

**वीरशैव लिंगायत ....**

रोख पारितोषिक

इयत्ता १० वी आणि इयत्ता १२ वी परीक्षेमध्ये वीरशैव लिंगायत समाजातील ज्या विद्यार्थ्यांनी सत्कार स्वीकारण्यासाठी जगद्विवेक प्रतिष्ठान कडे नोंदणी केली आहे. अशा विद्यार्थ्यांमधून जे विद्यार्थी दहावी आणि बारावी दोन्ही वर्गातून स्वतंत्ररित्या प्रथम येतील त्यांना ११०० रुपये रोख बक्षीस तर द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख ७०० रुपये बक्षीस तसेच तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख ५०० रुपये बक्षीस देण्यात येणार असून उत्तेजनार्थ निवडलेल्या विद्यार्थ्यास २५१ रुपये रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

जंगम समाजातील गरजवंतांस ऑपरेशनसाठी मदत करणार

जंगम स्वामी समाजातील ज्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट आहे. मात्र ऑपरेशन साठी पैशाची नितांत गरज आहे.अशा व्यक्तीची खात्री पटल्यानंतर त्यांना दहा हजार रुपयापर्यंत ऑपरेशनसाठी आर्थिक मदत स्वर्गीय जगदेवी विवेक स्वामी यांच्या स्मरणार्थ करण्यात येणार आहे. तेव्हा ज्यांना डोळ्याचे ऑपरेशन करायचे आहे मात्र आर्थिक परिस्थिती ऑपरेशन करण्यासारखी नाही अशा गरजवंत जंगम स्वामी समाजातील गरजवंतांनी आपले संपूर्ण नाव, गाव, तालुका, जिल्हा तसेच ऑपरेशन संदर्भात डॉक्टरांनी दिलेले रिपोर्ट्स हे ९४ २२ ७४ ४६ ०५ या भ्रमणध्वनीवर पाठवावेत. ज्यांना खरंच केवळ पैश्या अभावी ऑपरेशन थांबलेले आहे. अशाच एका गरजवंतांची निवड करून त्यांना आर्थिक मदत करण्यात येईल. तेव्हा गरजवंतांनी तात्काळ नोंदणी करावी असे जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

**अजित पवार कोत्या....**

परळीला मारहाण झालेला शिवराज दिवटे याच्यावर स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याच ठिकाणी आज अजित पवार हे बैठकीसाठी आले होते. अजित पवार हे शिवराज दिवटेची भेट घेणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र अजित पवार हे शिवराज दिवटे याची भेट न घेताच ते स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातून निघून गेले. अजित पवार यांच्या दौऱ्यात दिवटे याची भेट नव्हती. पण, अजित पवार यांनी बैठक घेतलेल्या बाजूच्याच बिल्डिंगमध्ये शिवराज दिवटे याच्यावर उपचार सुरु होते. मात्र अजित पवारांनी शिवराज दिवटे याची भेट घेतली नाही. दरम्यान, स्वामी रामानंद तीर्थ बाह्य विभागाची नूतनीकृत इमारत, मुलांच्या वस्तीगृहाच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय बी-बिल्डींग सर्जिकल वार्ड आणि नूतन मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण अजित पवार यांच्या हस्ते होणार होते. मात्र ही पाहणी व उद्घाटन न करताच अजित पवार हे पुढच्या कार्यक्रमासाठी झाले.

मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक संतापले

यावरून मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांनी संताप व्यक्त केलाय. अजित पवार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. पश्चिम महाराष्ट्र आणि बारामतीचा विकासाचा विषय आल्यानंतर अजित पवार सक्रिय होतात तर बीडच्या विकासावर मात्र दादा संवेदनाहीन होतात. दादा

## पान १ वरून...

अत्यंत कोत्या मनाचे आहेत. त्यामुळे शिवराज दिवटे या तरुणाला भेटण्यास गेले नाही. म्हणून आम्ही अजित पवार यांचा निषेध करतो, अशी प्रतिक्रिया मराठा समन्वयक गंगाधर काळकुटे यांनी दिली आहे.

**परळी आगारात ...**

या बसेसचे आज विधिवत पूजन करून लोकार्पण करण्यात आले, यावेळी अजय मुंडे यांच्या सह मान्यवर पदाधिकारी व नागरिकांनी नवीन बस मधून फेरफटका मारला. यावेळी अजयजी मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. विनोद जगतकर, बालाजी उर्फ पिंटू मुंडे, सुरेश टाक, के डी उपाडे, एजाज शेख, अनंत इंगळे, नितीन कुलकर्णी, शंकर कापसे, वसंत तिडके, संजय आघाव, सय्यद सिराज, दीपक तांदळे, रवी मुळे, अविनाश गवळी, सय्यद मुसा, रवी आघाव, महेंद्र रोडे, दत्ताभाऊ सावंत, गिरीश भोसले, गणेश सुरवसे, यांसह पदाधिकारी तसेच परळी आगाराचे अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

**अल्पवयीन मुलीचे ...**

वैजनाथ आरगडे रा. ताडपांगरी ता. जि. परभणी ह.मु. पांगरी ता. परळी वै. येथे मजूर म्हणून काम करतात. त्यांची १५ वर्षीय मुलगी बेपत्ता झाली आहे. तीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवुन घेऊन गेला आहे अशा प्रकारची फिर्याद देण्यात आली. या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरन-२१९/२०२५ कलम १३७ (२), इछड प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि जाधव हे करीत आहेत.

**राज्यस्तरीय खरीप....**

असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री.शिंदे म्हणाले, कृषीक्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी विविध कंपन्यांशी करार करण्यात आले आहेत. राज्यात नवकल्पनांना प्रोत्साहन दिले जात आहे. जलयुक्त शिवार योजनेचा पुन्हा प्रारंभ करून भूजल पातळी वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बांबू लागवडीसारख्या पर्यायांमुळे आर्थिक मूल्यवृद्धी होणार असल्याचे सांगून शेतकरी समृद्ध आणि सुखी व्हावा यासाठी शासनाच्या धोरणांची आणि योजनांची संबंधित सर्व विभागांनी एकत्रितपणे अंमलबजावणी करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

शेतकरी समाधानी राहिला तर राज्य समाधानी राहील-अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, सध्याच्या काळात कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असून, वाढती लोकसंख्या आणि शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर 'फार्म ऑफ द फ्युचर'सारख्या नव्या कल्पनांच्या अंमलबजावणीसाठी शासन कटिबद्ध आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि हवामान बदलासारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी कृषी योजनांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यात येत आहे. महाराष्ट्रात ५० हजार शेतकऱ्यांच्या शेतांवर या नवकल्पनांची अंमलबजावणी होत असून, उत्पादनवाढीसोबत मार्केट इंटेलिजन्स आणि सप्लाय चेनच्या माध्यमातून शेतमालाला योग्य बाजारभाव मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे. नवनवीन संशोधनामुळे अधिक उत्पादन, कमी पाणी आणि खताचा वापर शक्य झाला असून, क्रॉपिंग पॅटर्नमध्येही

## पान १ वरून...

लवचिकता आली आहे. शेतकरी आता विविध पिकांचे चक्र बदलून अधिक उत्पादन मिळवत आहेत. सरकारकडून चांगल्या कामांना प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकरी समाधानी राहिला तर राज्य समाधानी राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कृषी मंत्री ड.कोकाटे यावेळी म्हणाले, कृषी उत्पादनात महाराष्ट्राने गतवर्षी विक्रमी वाढ नोंदवली असून, अन्नधान्य उत्पादनात २७ टक्के वाढ झाली आहे. यंदा १५२ लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप पिके घेतली जाणार असून, बियाणे आणि खतांची आवश्यकतेपेक्षा अधिक उपलब्धता असल्याचे त्यांनी सांगितले. कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती त्यांनी यावेळी दिली. ते म्हणाले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प व बाळासाहेब ठाकरे स्मार्ट प्रकल्पांमधून हजारो गावांचा समावेश करण्यात आला आहे. कृषी निर्यातीत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून, द्राक्ष, डाळिंब, आंबा आणि भाजीपाला यांची प्रमुख निर्यात होत आहे. शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी 'गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना'मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मदत वितरित करण्यात आली आहे. राज्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी पाच हजार कोटींची गुंतवणूक मंजूर करण्यात आली आहे. खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी शासन सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यमंत्री श्री.जयस्वाल यांनी पाण्याच्या योग्य नियोजनावर भर देण्यात येणार असल्याचे सांगून शेतकऱ्यांना डीबीटीमध्ये येत असलेल्या समस्यांचा विचार करुन डिजिटल करन्सीचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ सुलभतेने घेता यावा यासाठी सातबारावर शेतकऱ्यांच्या नोंदी अद्ययावत करुन घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी खरीप हंगाम तयारीबाबतचे सादरीकरण करताना विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची तसेच नव्याने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. 'साथी' पोर्टलवर बियाणे उपलब्ध करुन दिले जात असून केंद्र सरकारकडून या उपक्रमाचे कौतुक करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. विकसित कृषी संकल्प अभियानाच्या माध्यमातून ६,७५० गावांमधील १३ लाख ५० हजार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. तर, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी २०२५-२६ मधील पीक कर्ज वाटपाबाबत माहिती दिली. कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी प्रास्ताविकाद्वारे यावर्षी एक लाख कोटींच्या कृषी उत्पन्नाचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले.यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते महाविस्तार प, महा डीबीटी योजनेअंतर्गत प्रथम येणाऱ्यास प्राधान्य योजना, कृषी विभागाची दिशादर्शिका आदी पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले. या आढावा बैठकीस बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, विभागीय आणि जिल्हा स्तरावरील संबंधित वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

# महापुरुषांच्या जयंती उत्सवात माणूस जोडण्याचे प्रयत्न व्हावेत ; मान्यवरांनी व्यक्त केल्या भावना

## अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यास प्रारंभ

प्रतिनिधी @ परळी

महापुरुषांच्या जयंती मध्ये डीजेच्या तालावर कर्कश आवाजात नाचून तरुणाई बिघडवण्यापेक्षा वैचारिक आणि अध्यात्मिक विचार मंथनातून नवी पिढी घडवण्याचा संकल्प सिरसाळा पंचक्रोशीच्या वतीने साजरा करण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक आहिल्यादेवी त्रिजन्मशताब्दी सोहळ्यात करण्यात आला. जात-धर्माच्या पलिकडे जाऊन माणूस घडविण्याचा प्रयत्न अशा जयंती महोत्सवातून व्हावा असा आशावादही यावेळी सर्व वक्त्यांनी व्यक्त केला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने सिरसाळा पंचक्रोशीच्या वतीने पंचदिनी कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा उद्घाटन सोहळा बुधवारी रेणुका माता मंदिर, सिरसाळा येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती प्रभाकर वाघमोडे



तर उद्घाटक म्हणून शेतकरी नेते अजय बुरांडे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून शेतकरी नेते अमर हबीब, डॉ. राजाराम मुंडे, बालासाहेब दोलताडे, व्यंकटेश चामणर, दिलीप आबा बिडकर, संतराम गडदे, बाबासाहेब काळे, पांडुरंग काळे, अशोक करे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमा मागील भूमिका स्पष्ट करताना संयोजक शामसुंदर महाराज सोन्नर म्हणाले की, महापुरुषांच्या जयंती मधून समाजाला काहीतरी दिशा मिळाली पाहिजे, परंतु आज आपण पाहतो आहोत की, कोणत्याही महापुरुषाची जयंती ही डीजेच्या दणदणाटात आणि नशेच्या धुंदीत पार पडते. यातून त्या महापुरुषांच्या विचाराचा जागर होण्याऐवजी त्यांच्या विचारांना तिलांजली दिल्याचे दिसून येते. म्हणूनच डीजे मुक्त जयंती साजरी करता येऊ शकते. याचा वस्तू पाठ घालून देण्यासाठी पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांच्या त्रिजन्मशताब्दी सोहळ्या निमित्ताने हे वैचारिक जागरण मांडले आहे. या कीर्तन महोत्सवातून मोक्षमुक्तीचा विचार दिला जाणार नाही तर संतांनी आणि महामानवाने मांडलेल्या मानवतेचा विचार मांडला जाईल. जात धर्माच्या पलीकडे जाऊन माणूस आपण एक झालं पाहिजे. यासाठी हा सोहळा आहे असे शामसुंदर महाराज म्हणाले.

शेतकरी नेते अमर हबीब यांनी या वेळेला शेतकरी नेमका कोणत्या कारणाने अडचणीत आहे याची माहिती दिली. कोणतेही नैसर्गिक संकट आलं की पहिला शेतकरी भरडला जातो. शेतकरी दुबळा आहे आणि त्याला जास्तीत जास्त दुबळ्या ठेवण्याचे काम इथले शासन व्यवस्था करते आहे असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना उद्घाटक अजय बुरांडे म्हणाले की, या कार्यक्रमातून सध्या समाजामध्ये जात, धर्म यावरून जी दरी निर्माण झाली आहे, ती दरी सांधण्याचा प्रयत्न केला जाईल. कान्नापूर येथील शेतकरी कीर्तन महोत्सव, सिरसाळ्याचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या त्रिजन्मशताब्दी सोहळ्याचा उत्सव हा माणूस जोडण्याचा प्रयत्न आहे, यातून समाजात सकारात्मक बदल घडतील असा अशावाद बुरांडे यांनी व्यक्त केला.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रभाकर वाघमोडे म्हणाले की, सध्या महापूरुषांच्या जयंत्यामधून चांगले विचार समाजात रुजविण्या ऐवजी बहुतांशी तरुणाई बिघडत आहे. कोणत्या तरी नेत्याकडून देणगी आणायची, डीजे लावायचा त्यातून तरुणाई बिघडत आहे. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी डीजे मुक्त आणि वैचारिक मंथन करणारी जयंती कशी साजरी करता येईल याचा उत्तम वस्तूपाठ घालून दिला आहे. यावेळी डॉ. राजाराम मुंडे, बाबूराव रुपनर यांचीही भाषणे झाली. देवराव काळे, सतीश काळे, व्यंकटेश काळे, गोरख काळे, सुधाकर काळे, अशोक गलांडे, मुंजाभाऊ होनमाने, शिवाजी काळे, नितेश काळे आदींनी सिरसाळावासियांच्या वतीने सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्र संचालन बंडू खांडेकर यांनी तर मुन्ना काळे यांनी आभार मानले. यावेळी तुकाराम येवले, बबनराव सरोदे, विशाल देवकते, रत्नाकर देवकते, चंद्रकांत देवकते,



# मंजरथ येथील घाटाची स्वच्छता करत केली गंगाआरती

प्रतिनिधी @ माजलगांव

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमीत्त तालुक्यातील मंजरथ येथील गोदावरी नदीकाठावरी घाटाची स्वच्छता करत गंगाआरती भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज दि. २१ मे २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता करण्यात आली.यावेळी भाजपाच्या तालुकाध्यक्षा रूपाली शरद कचरे, ज्ञानेश्वरी सरवदे, विनायक रत्नपारखी, डॉ. अभिजीत सोळंके, शरद कचरे, संतोष वाघमारे, गणेश जोशी, मनोज कोरडे, अविनाश कांडुरे, गौरी देशमुख, वैष्णवी होके यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना रूपाली कचरे यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या जिवनचरित्रावर प्रकाश टाकला. एक सक्षम आणि न्यायप्रिय शासक म्हणुन अहिल्याबाई यांची ओळख आहे. त्यांनी राज्यकारभारात धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक सुधारणा करत कारभार केला. अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि जलव्यवस्थापनाची कामे केली. ज्यामुळे लोकांना अनेक सुविधा मिळाल्या. तालुक्यातील मंजरथ येथील गोदावरी नदीवरील घाट देखील त्यानीच बांधलेला असुन आजघडीला सुस्थितीत आहे. परंतु येणा-या भाविकांच्या वर्दळीने मोठी अस्वच्छता निर्माण झाली होती. त्यामुळे अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधुन गोदाघाटाची स्वच्छता करण्यात आली तसेच गंगा आरती देखील करण्यात आली. यावेळी गावातील महिला, पुरूष व भाजपा कार्यकर्त्यांसह शंभरपेक्षा अधिक भाविकांची आरतीला उपस्थिती होती.

# जिजाऊ इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल जाफ्राबाद निकालाची परंपरा कायम

प्रतिनिधी @ जाफ्राबाद

जिजाऊ इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल जाफ्राबाद ता. जाफ्राबाद जि.जालना येथील मार्च २०२५ ड.ड.उ परिक्षाचा निकाल यावर्षीही - १००% विशेष प्राविण्य प्राप्त विद्यालयातील विद्यार्थी सी.बी.एस. सी. बोर्ड १) प्रथम क्रमांक :- विठ्ठल किसन गायकवाड ९१.४०% २) द्वितीय क्रमांक :- ८९.२०% ३)तृतीय क्रमांक:- ८९.००% स्टेट बोर्ड १) प्रथम क्रमांक :- शेख राहत फारुख -८७.२० % २) द्वितीय क्रमांक - शेख अमन नूर - ८५.६०% ३) तृतीय क्रमांक - चव्हाण भागवत भानुदास८३.००% हे त्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक अत्यंत गौरवशाली यश आहे आणि संपूर्ण



शाळेसाठी अभिमानाची बाब आहे. या उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे जिजामाता ग्रामीण विकास शिक्षण संस्थेच्या व शाळेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. सुरेखाताई लहाने ,संजयजी लहाने ,प्राचार्य योगेश आर. शिंपी ,आर. जी.धारकर, व्ही. डब्ल्यू. दुनगहू एन.आर.खान तसेच संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून पुष्पगुच्छ व शाल श्रीफळ देऊन मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी जिजामाता ग्रामीण विकास शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# सुरुडी आश्रमशाळेचा नाविन्यपूर्ण उपक्रम

## १० वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गावीजाऊन सत्कार समारंभाचे आयोजन

प्रतिनिधी @ आष्टी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सुरुडी ता. आष्टी, जि. बीड येथील शाळेचा निकाल दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १०० टक्के लागला. कु. पूनम गायकवाड या विद्यार्थिनीने छत्रपती संभाजीनगर प्रकल्पातील सर्व शासकीय आश्रमशाळेतून प्रथम क्रमांक पटकावला तसेच चि. सुरज चिभडे हा शाळेतून द्वितीय व कु. बाळूबाई डाखोरे हिने शाळेतून तृतीय क्रमांक मिळवला.

यावर्षी मा. प्रकल्पअधिकारी मॅडम यांच्या प्रेरणेने व सुरूडी टीमच्या सहकार्याने मुख्याध्यापक सुधाकर राठोड यांनी अनोखा उपक्रम हाती घेतला. १० वी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या गावी जाऊन गावातील नागरिक व पालकांसमोर विद्यार्थ्यांचा मानसन्मान करण्याचे आयोजन करण्यात आले.

हा अनोखा उपक्रम पाहून गावातील सर्व नागरिक अतिशय आनंदी झाले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली, त्यानंतर गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा स्वागत



सत्कार करण्यात आला तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना शाळेतर्फे भेटवस्तू देण्यात आली. गावातील नागरिकांनी तसेच माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व या नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत कौतुक व्यक्त केले व सुरुडी आश्रमशाळेची १०० % निकालाची परंपरा अशीच चालू राहावी यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाबद्दल प्रकल्प कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्पाधिकारी मॅडम तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी व शासकीय आश्रम शाळा सुरुडी येथील मुख्याध्यापक सुधाकर राठोड, नीता मुंडे, संभाजी मुसळे, शिवाजी गांधले, संतोष मेहत्रे, विशाल दोरगे, कविता पानसरे, नवनाथ रेवणकर, प्रतीक्षा मेश्राम, सुरज शिंदे, प्रवीण पुंड, केतन काकडे, संगीता जाधव, अमित पवार, वैजनाथ आतकरे, चांगदेव पवार, प्रियंका नवले, निलेश आहेर, मदन सावंत, शाहुराव सानप, किसन शिंदे, वेणूबाई केसकर, मोहन जाधव, विलास जाधव, मच्छिंद्र शिरसाट, सुनिता खरात, बाबू हजारे, रेणुका खोकले, संदीप ढेपे, सर्व शिक्षक तथा कर्मचारी वृंद व पालकांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कमानीसाठी दौनापूर येथील बौद्ध समाजाच्या उपोषणाचा दुसरा दिवस

## अनेक नेत्यांनी भेटी देऊन दिला पाठींबा

प्रतिनिधी @ परळी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व बहुजन समाजाचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कमान उभारण्यासाठी परवानगी द्यावी या मागणीसाठी आज दिनांक २० मे पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बौद्ध समाजाच्या वतीने महिला,लेकरा बाळासह उपोषण सुरू करण्यात आले आहे.या उपोषणाचा आज दुसरा दिवस असून बीड जिल्ह्यातील बहुजन समाजाच्या अनेक नेत्यांनी उपोषणाला भेट देऊन आपला पाठींबा दिला.

याबाबत परळी तालुक्यातील दौनापूर येथील बौद्ध समाजाने बीड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते .या निवेदनात म्हंटले होते की,दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी दौनापूर येथील बौद्ध समाजाच्या वतीने ग्रामपंचायतीला बौद्ध वस्ती समोरील रस्त्यावर प्रवेशद्वार अर्थातच कमान उभारण्याची परवानगी मागण्यासाठी अर्ज केला. त्यावर ग्रामपंचायतीने परवानगी तर दिलीच नाही उलट सरपंच राजेभाऊ प्रभाकर आघाव यांनी ग्रामपंचायतीचा ठराव घेतला.व ठरावा द्वारे कमानीला परवानगी देण्यात येणार नाही असे सांगितले होते.त्यानंतर दौनापूर येथील बौद्ध समाजाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेशद्वार,( कमान) करण्याची परवानगी द्यावी अन्यथा २० मे २०२५ पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता.

आज उपोषणाचा दुसरा दिवस आहे.मिलिंद घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली चाललेल्या आमरण उपोषणास बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे , राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दयानंद भाऊ स्वामी, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे आंबेडकर चळवळीचे जेष्ठ नेते बबनराव वडमारे, वंचित बहुजन आघाडी जिल्हा नेते धम्मानंद साळवे,वंचित बहुजन आघाडीच्या महिला नेत्या पुष्पाताई तुरुकमारे, बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रशांतजी वासनिक, ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, वंचित बहुजन आघाडीचे महासचिव ज्ञानेश्वर कवठेकर वंचित बीड जिल्हा नेते पुरुषोत्तम वीर, ज्येष्ठ नेते अर्जुन उजगरे, संभाजी ब्रिगेडचे नेते सेवकराम जाधव, जिल्हा प्रतिनिधी सुनील डोंगरे, पत्रकार केशव मुंडे, बहुजन विकास मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाने, एकतावादीचे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे, आर के आरसुळे, अंकुश गंगावणे, विठ्ठल ढोकणे, नितीन शिंदे ,भास्कर वाघमारे, वंचित ज्येष्ठ नेते भीमराव पायाळ, पत्रकार राजू जोगदंड, पत्रकार मिलिंद आदमाने, पत्रकार संतोष राजपूत, आझाद क्रांती सेना बीड कृष्णा पाटोळे इत्यादी अनेक मान्यवरांनी उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा जाहीर केला.

दिलेल्या निवेदनानुसार वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे तसेच उपोषण कर्ते रामचंद्र भगवान घाडगे, चंद्रमुनी रामकिशन घाडगे, रामचंद्र दिलीप बनसोडे, हरिभाऊ साधू घाडगे, किशन अच्युत घाडगे यांच्यासह रोहिदास घाडगे, लक्ष्मण घाडगे, नागुराव गायकवाड, दिलीप बनसोडे ,कोंडीराम घाडगे, कमलाकर घाडगे, एडवोकेट विवेक वैद्य, धनंजय घाडगे ,दीपक बनसोडे, सुजित घाडगे, फुलचंद घाडगे, सचिन घाडगे, महेंद्र घाडगे, छगन घाडगे, कालिंदा घाडगे, रेखा घाडगे, कावेराबाई घाडगे, वैजयंती घाडगे, मोहिनी घाडगे, रेखा बनसोडे, मंदाबाई वाव्हळे आदी उपोषणाला बसले आहेत.

# जुळ्या बहिण-भावानी मिळवले गुण ही जुळेच

प्रतिनिधी @ आष्टी

दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून आष्टी तालुक्यातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यशाची परंपरा कायम जपली आहे. तालुक्यातील आष्टी येथील जुळ्या बहिण - भावानी गुणांमध्ये समानता राखली आहे. आदित्य मुळे, अंकिता मुळे या दोघांना ही जवळपास सारखेच गुण मिळाले आहेत.

आष्टी येथील सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेले अजित मुळे यांची ही दोन जुळी मुले आहेत. वसुंधरा विद्यालयात शिकणारी अंकिता मुळे हिने ९४.८० टक्के तर आदित्य मुळे ९४.८० गुण मिळवत घवघवीत यश प्राप्त केले. यांनी केवळ शाळेचेच नव्हे, तर संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. दोघांच्या यशाबद्दल महात्मा फुले प्रतिष्ठान आष्टी यांच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.

आष्टी शहरातील अजित मुळे यांच्या लेका व लेकीने आपसात मैत्री, स्पर्धा आणि एकमेकांना प्रेरणा देणाऱ्या या भावंडांनी शिक्षणाच्या वाटेवर एकत्र वाटचाल करत उंच भरारी घेतली. बहिण - भावाने यशाचे 'जुळे' शिखरच गाठले आहे. अंकिता मुळे हिने ९४.८० टक्के तर आदित्य मुळे ९४.८० गुणांसह आपल्या गुणवत्तेचा ठसा उमठवला. अशा निकालामुळे दोघेही गौरवाचे केंद्र बनले. सेल्फ स्टडी आणि कुटुंबाच्या पाठिंब्याने हे शक्य झाले आहे. या दोघांचे वडील उद्योजक



तर आई उषा अजित मुळे या शिक्षिका आहेत. त्यांनी आपल्यामागे व्याप असताना ही तितक्याच जबाबदारीने लक्ष दिलं. त्यांनी मुलांना 'सेल्फ स्टडी' वर भर देण्यास प्रवृत्त केलं आणि त्यांचा परिणाम म्हणजे हे प्रचंड यश.

आदित्य व अंकिता यांनी शाळेतील वेळ पूर्णपणे शैक्षणिक प्रगतीसाठी वापरला होता. ते सतत शिक्षकांच्या आई वडिलांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास, नोट्स, चाचण्या यावर लक्ष केंद्रित करत होते. त्यांचा अभ्यास हा केवळ गुणांपुरताच मर्यादित नव्हता, तर आत्मउत्कर्षासाठी होता आणि त्याचीच ही फळं! हे यश केवळ सुरुवात आहे. आम्हाला आणखी उंचीवर जायचे आहे. इंजिनिअरींग क्षेत्रात करिअर करायचे आहे असे आदित्य व अंकिता बहिण - भावाने सांगितले.

# छगन भुजबळ यांनी मंत्री पदाची शपथ घेताच पाटोद्यात जल्लोष



प्रतिनिधी @ पाटोदा

ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते छगन भुजबळ यांनी आज राजभवनात मंत्रीपदाची शपथ घेतली. या घडामोडीने संपूर्ण राज्यासह पाटोदा तालुक्यातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले.भुजबळ यांच्या शपथविधीची बातमी समजताच त्यांच्या समर्थकांनी पाटोदा शहरातील संत सावता महाराज चौक येथे एकत्र येऊन जल्लोष साजरा केला. फटाके वाजवून आणि घोषणा देत त्यांनी आपला आनंद व्यक्त केला.

भुजबळ यांच्या कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. भुजबळ साहेबांचे मंत्रीपद ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे, असे भावनिक उद्गार समता परिषद तालुका अध्यक्ष डिगांबर नाईकनवरे यांनी व्यक्त केले. मंत्री पदाची छगन भुजबळ यांनी शपथ घेताच पाटोद्यात जल्लोष यामध्ये पाटोदा तालुक्यातील समता सैनिक व नागरि उपस्थित होते



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा ना श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची मुंबई येथील निवासस्थानी आमदार श्री नारायण कुचे यांनी भेट घेतली यावेळी जालना भाजपा जिल्हाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल आमदार कुचे यांनी फडणवीस साहेब यांचे आभार मानले.

# गोंदी येथून दीडशे ब्रास वाळू केली जप्त

## तहसीलदारांनी केला १६ जणांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी @ अंबड

तालुक्यातील गोंदी येथे दीडशे ब्रास वाळू गोदावरी नदीपात्रातून चोरी गेल्या प्रकरणी १६ वाळू तस्करी करणाऱ्या विरुध्द गोंदी पोलिस ठाण्यात १६ जणांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले. अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांच्या आदेशावरून गोंदी येथील तलाठी किरण रवींद्रकुमार जाधव व मंडळाधिकारी कृष्णा एडके, अशोक शिंदे यांनी गोदावरी नदीपात्राची पाहणी करत सिद्धेश्वर महादेव मंदिरालगत अवैधरीत्या वाळूचे उत्खनन झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या ठिकाणावरून दीडशे ब्रास वाळूचे उत्खनन झाल्याचे लक्षात आल्याने



मंडळाधिकारी कृष्णा एडके यांनी पंचनामा केला. या प्रकरणी वाळू तस्कर किशोर प्रभु खराद, विकास सुरेश खराद, मनोज सुरेश खराद, कचरु उत्तम खराद, ऋषीकेश विश्वबंर खराद, डिगांबर रघुनाथ शिंदे, अक्षय राजाभाऊ बानाईत, सोपान

दिनकर खराद, राहुल बळीराम खराद, बाबा अर्जुनराव कुर्लेकर, अदिनाथ दत्ता शिंदे, स्वप्नील तात्या मरकड, अवधूत दत्ता मिटकुल, गणेश कैलास मरकड, महिंद्र कचरु खरात, अ ण्णासाहेब संजय सोळुंके (रा. गोंदी) या सोळा लोकांवर गोदावरी नदीपात्रातून अवैधरीत्या लाखो रुपयांची वाळू वाहनाने चोरून नेल्या प्रकरणी गोंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक बलभीम राऊत, पोलिस कर्मचारी शाकेर सिद्दिकी हे करीत आहेत.

# बीड जिल्हा थलेटिक्स खेळाची आष्टी येथे निवड चाचणी

**प्रतिनिधी @ आष्टी**

महाराष्ट्र थलेटिक्स संघटनेच्या वतीने मुंबई - पुणे येथे आयोजित वरिष्ठ (महिला - पुरुष) गट राज्य अजिंक्यपद स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेत बीड जिल्ह्याचा संघ सहभागी होणार आहे.या संघाची निवड करण्याकरिता आष्टी येथील डॉ. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयात निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १ जून २०२५ रविवार रोजी सिनियर पूरुष व महिला गटाची निवड चाचणी सकाळी ७ वा. सुरु होईल. महाराष्ट्र थलेटिक्स असोसिएशनच्या वतीने नियुक्त केलेले प्रा. डॉ. भागचंद्र सानप, दिनेश पवार, प्रा. डॉ. संतोष वनगुजरे, प्रा. रविन्द्र खरात व प्रा. सुखदेव माने या पाच सदस्याची बीड जिल्हा थलेटिक्स संघाची निवड करण्याकरिता सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बीड जिल्हा संघटनेच्या वतीने आयोजित जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी मध्ये १०० मी., २०० मी., ४०० मी., ८०० मी., १५०० मी., ५००० मी., १०००० मी., ३०००० मी. स्टीपलचेस, लांब उडी, उंच उडी, बांबू उडी, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, हातोडा फेक, ४*१०० मी रिले, ४*४०० रिले व २० किमी चालणे इत्यादी गटात या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेमधून विजयी खेळाडू मुले व मुलींची निवड बीड जिल्हा संघात केली जाणार आहे. खेळाडूंनी सोबत आधार कार्ड, जन्म दाखला (नगरपालिका - ग्रामपंचायत), २ पासपोर्ट साइज फोटो, १० वी प्रमाणपत्र (सनद), सोबत आणावे. जिल्हा संघात निवड झालेल्या खेळाडुंना एएफआय ची युआयडी नंबर काढणे अनिवार्य राहील.

या स्पर्धेत १८ वर्षांवरील फक्त बीड जिल्ह्यातील खेळाडूच सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेत अधिकाधिक खेळाडुनी सहभागी



व्हावे असे आवाहन जिल्हा संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील पात्र व ईच्छुक खेळाडुंनी नाव नोंदणी १०० रु. प्रति क्रीडा प्रकार या प्रमाणे दिनेश पवार (मो. ८३०८३७८१४३) व प्रा. डॉ. संतोष वनगुजरे (मो. ७७०९१३५१५१) यांच्याकडे दिनांक ३० मे २०२५ पर्यंत नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# अवकाळी पावसामुळे पिकाला दिलासा..!

## मांजरा धरणाच्यादोन्ही कालव्यातुन पाण्याचा विसर्ग बंद

**प्रतिनिधी @ केज**

**आठ दिवसापासून केज तालुक्यात ढगाळ वातावरण व मान्सूनपूर्व पाऊस पडत असल्यामुळे उन्हाळी हंगामात ऊसासह ईतर पिकांना चांगलाच दिलासा मिळाला आसून तालुक्यातील मांजरा धरणातून डाव्या व उजव्या कालव्याद्वारे सिंचनासाठी सुरू असलेल्या उन्हाळ्यातील तिसऱ्या आवर्तनात सुरु असलेला पाणी पुरवठा बुधवारी सकाळी ६ वाजल्यापासून बंद करण्यात आला आहे.**

२२४.०९३ दलघमी साठवण क्षमता आसलेल्या मांजरा धरणात सध्या स्थितीत ३३.४०३ दलघमी इतका उपयुक्त पाणीसाठा आहे. या धरणातून लातूर, बीड आणि धाराशिव जिल्ह्यातील लातूर शहर, एमआयडीसी, अंबाजोगाई, केज, धारूर, कळंब या प्रमुख शहरांसह ६३ गावांसाठी पाणीपुरवठा केला जातो. व या तीनही जिल्ह्यातील ७३ गावांतील १८ हजार २२३ हेक्टर जमीन सिंचनाखाली येते. अप्रत्यक्षरित्या उपसा सिंचनाद्वारे तीन जिल्ह्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येते.

शेतीसाठी पाण्याचा असा आहे वापर

उजवा कालवा:- २५.७१२ दलघमी

डावा कालवा: -२८.१३३ दलघमी

सिंचनासाठी नदीद्वारे पाण्याचा विसर्ग: २२.६५४.

मान्सूनपूर्व पावसाने उन्हाळी पिकांना दिलासा मिळाला असून सद्यस्थितीत पिकांसाठी पाण्याची मागणी नसल्या मुळे मांजरा धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यातुन सुरू असलेले तिसरे उन्हाळी आवर्तन बंद करण्यात आले आहे. ढगाळ वातावरणामुळे मागील आठ दिवसापासून पाण्याचे बाष्पीभवन देखील कमी प्रमाणात झालेले आहे .सद्यस्थितीत प्रकल्पात १८.८६% इतका उपयुक्त पाणीसाठा आसल्याची माहिती धनेगाव येथील मांजरा धरणाचे शाखा अभियंता सुरज निकम यांनी बोलताना दिली.

## बीड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्तीबाबत

**प्रतिनिधी @ बीड**

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे कार्यालयासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठी जाहिरात व विहीत केलेला अर्जाचा नमूना या कार्यालयाचे वेबसाईट www.beed.nic.in वर दि.२१.०५.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या कंत्राटी पदासाठी उमेदवाराने आपला विहीत नमून्यातील अर्ज --४ साईजच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखित - हस्तलिखित करुन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड-४३११२२ या पत्यावर दिनांक २३ मे, २०२५ रोजीपासून ते दि. ०५ जून, २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत विहीत नमून्यात अर्ज पोहोचेल अशा रितीने पोस्टाद्वारे किंवा आवक जावक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे समक्ष सादर करावेत. या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या विहीत नमुन्यातील अर्जाचा विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या कंत्राटी पदासाठी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी, पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन) अशी आहे. तसेच प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर भरती प्रक्रियेसंदर्भात पुढील माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळ www.beed.nic.in वर प्रसिद्ध करण्यात येईल.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पार पाडली जाणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

# आकाशात वीज चमकत असताना नागरिकांनी घ्यावयाच्या खबरदारी

**प्रतिनिधी @ बीड**

हंगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या विविध भागात वीज चमकण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. वीज कोसळणे ही एक गंभीर नैसर्गिक आपत्ती असून नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्व नागरिकांना खालील खबरदारीचे उपाय काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

वीज चमकत असल्यास घ्यावयाच्या खबरदारी: विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर राहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

या गोष्टी करू नका

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली आंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाईन यांना स्पर्श करू नका. तसेच कुठल्याही विद्युत उपकरणाचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या साह्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडांच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे राहू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारात अथवा खिडकीतून वीज पडताना बाहेर पाहू नका व बाहेर थांबणे तितकेच धोकादायक आहे.

उपयोगी मोबाईल प्सची माहिती,

दामिनी प - हे प भारतीय हवामान विभागाने विकसित केले असून विजेच्या गडगडाट आणि संभाव्य ठिकाणांची माहिती नागरिकांना वेळेवर मिळवून देण्याचा उद्देश आहे. हे प आपल्या स्थानाच्या २० किमी परिसरात वीज कोसळण्याची शक्यता असल्यास तात्काळ अलर्ट पाठवते. वापरण्यास अगदी सोपे असून मराठीसह विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे. त्रेश्नश्रश झश्रू डींश आणि -ग्रिश - र्डिीश वर हे प मोफत उपलब्ध आहे.

सचेत प - हे प आपत्ती व्यवस्थापन विभागाने विकसित केले असून भूकंप, पूर, वीज चमकणे, वादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या अलर्टस पुरवते. स्थानिक हवामान आणि संभाव्य आपत्तींची अचूक माहिती, सजगता आणि मार्गदर्शन यातून मिळते. या पच्या साह्याने नागरिक वेळेत सुरक्षिततेचे पावले उचलू शकतात. झश्रू डींश आणि -र्डिीश वर मोफत उपलब्ध आहे.

आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी वरील खबरदारीचे उपाय वेळेवर आणि शिस्तबद्धपणे पाळावेत. प्रशासन आपत्ती व्यवस्थापनासाठी सदैव सज्ज असून नागरिकांनी देखील सजग राहणे गरजेचे आहे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.



## मौजे पराडा येथील शेतकरी शेख जैनुद्दीन शेख रहीमोद्दीन यांचे
# अवकाळी पावसाने कुसुम कंपनीचे सोलार पॅनल झाले नुकसान

**प्रतिनिधी @ अंबड**

तालुक्यातील मौजे पराडा येथील शेतकरी शेख जैनुद्दीन शेख रहीमोद्दीन रा पराडा ता अंबड जि जालना यांचे दि,०५/०५/२०२५ सोमवारी सायंकाळी पाच च्या सुमारास गट क्रमांक ६९ मध्ये अवकाळी पाऊस व सुसाट वाऱ्यामुळे कुसुम कंपनीचे सोलार पॅनल चे मोठे नुकसान झाले असून तरी कुसुम कंपनीने शेतकरी शेख जैनुद्दीन शेख रहीमोद्दीन यांचें नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे

## न्यू हायस्कूल दावरवाडी शाळेचा निकाल (९५.०० )टक्के


**प्रतिनिधी @ पैठण**

पैठण तालुक्यातील दावरवाडी येथील उच्च माध्यमिक न्यू हायस्कूल दावरवाडी शाळेचा एसएससी बोर्ड परीक्षेचा ९५.०९ टक्के निकाल लागला आहे दावरवाडी न्यू हायस्कूल शाळेतील गुण मिळवणारी विद्यार्थिनी प्रथम-कु.प्रीती हरिचंद्र भवरे ९६.६० टक्के २) कु.श्रावणी विठ्ठल गव्हाणे -९४.४० टक्के ३) भाग्यश्री बाबासाहेब काळे -९३.२० टक्के प्रथम आलेल्या मुलींचा न्यू हायस्कूल शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला एकूण प्रविष्ट विद्यार्थी संख्या -१६३ पैकी १५५ विद्यार्थी पास झाले आहे प्रथम आलेल्या मुलींचा शाळेय समिती अध्यक्ष श्याम तांगडे शालेय समिती सदस्य प्राचार्य गोजरे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे स्वागत केले

# ज्ञानसागर विद्यालयाचा दहावीचा निकाल १००% टक्के

**प्रतिनिधी @ जाफ्राबाद**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दहावीचा परीक्षांचा निकाल सोमवारी दि.१३ मे रोजी दुपारी ऑनलाईन पध्दतीने जाहिर करण्यात आला. त्यात ज्ञानसागर माध्यमिक विद्यालय जाफ्राबाद या शाळेचा निकाल १००% लावत विद्यालयाने यावर्षीही उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे यामध्ये कु.पूजा गजानन जाधव या विद्यार्थीने - ९१.६६. टक्के गुण संपादन करुन विद्यालयातुन प्रथम क्रंमाकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान मिळविला आहे.तर कु. शिल्पा रवींद्र रगडे - ८९.८६% व्दितीय , : कु. श्रद्धा समाधान मरकड - ८८.४०% तृतीय कु.शितल कृष्णा गायकवाड - ८८.२०% चतुर्थ, कु. कल्याणी विष्णू उबाळे - ८७.२०% पाचव्या क्रंमाकांने उत्तीर्ण झाली आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांचे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पा. दानवे ,आ. संतोष पा.दानवे, संस्थेचे अध्यक्ष सुरेशजी दिवटे,सचिव बी.के. जाधव,मुख्याध्यापक निवृत्ती दिवटे, श्रीमती बकाल एस के, पाटील. एस. बी, वानखेडे एस. एम. अंभोरे पी. पी, बन्सवाल डी. ए, उखर्डे आर. आर,वायाळ जी. एस, कळंबे ए.आर., श्री ईलग एस.एस., श्रीमती आत्राम एम. ए, शेळके बी.पी, रोडगे एल. टी, कोरडे. एस.बी. बकाल जी. के, दिवटे आर. ए, बरडे ए. ए, जोशी एस. के, खडेकर आर. बी, माळी डी. बी, शिंदे एस. एन, यांच्यासह शिक्षक शिक्षकेत्तर कर्माचाऱ्यांनी अभिनंदन केले.



एस. बी. ओ. ए. पब्लिक स्कूल संभाजीनगर मधील विद्यार्थिनी कु. गौरी सुभाष भालके हिने ९७.२०/ टक्के गुण घेऊन जाफराबाद तालुक्यातुन प्रथम क्रमांक यश संपादन केले आहे. तरी तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे सदरील विद्यार्थिनींचे सध्या वडील बी एस एफ मध्ये कार्यरत असुन कौतुक करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व परत युद्ध असल्यामुळे परत ड्युटीवर जॉईन झाले.

## दावरवाडी येथे प्रथम वर्ष श्राद्ध निमित्त भागवत कथेचे आयोजन....!

**प्रतिनिधी @ पैठण**

दावरवाडी येथील श्रीमद् भागवत कथा व ज्ञानयज्ञ सोहळा व प्रथम वर्षश्राद्ध असल्याने भागवत कथेचे नियोजन करण्यात आले आहे बबनराव गंगाधर वाघमोडे राजेंद्र गंगाधर वाघमोडे जिल्हा नियोजन समिती छत्रपती संभाजीनगर सोसायटी चेअरमन यांच्या मातोश्री कै ग.भा. पार्वती बाई गंगाधर वाघमोडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ श्रीमदभागवत कथा व ज्ञानयज्ञ सोहळा भागवत चार्य ह भ.प भाऊसाहेब महाराज जोशी (राजपिंपरीकर)

शेवट सांगता होईल ह भ.प बाळू



महाराज गिरगावकर यांचे शेवटच्या दिवशी कीर्तन होईल सात दिवस श्रीमद् भागवत कथा राहणार आहे दावरवाडी येथील श्रीराम मंदिरामध्ये कथेचे नियोजन ठेवले आहे पहिल्या दिवशी शेकडो पुरुष व महिला यांनी कथा ऐकण्यासाठी हजेरी लावली होती

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४२**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- २९/०१/२०२५**

अर्जदार श्री./ :- हमद सबीत बदाम प्रकरण :- सर्व्हे नं.४३४ सहान प्लॉट नं.१४ न.प.मि.नं.१८-१५२-१४ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( ---------- ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला ----------- येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- प्लॉट नंबर १५ ते १८
पश्चिम :- मार्डी रोड
दक्षिण :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर :- सर्व्हे नंबर ४३४ मधील भाग
मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड

# आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूलची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम......!

## प्रमोद मैंदड ९५.८६% घेऊन प्रथम, सायली लाड ९५ टक्के घेऊन द्रितीय,तर ऋतुजा मुळे ९४.६०% तृतीय



**प्रतिनिधी @ पैठण**

पैठण येथील विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान संचालित आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूलचा याही वर्षी शंभर टक्के निकाल लागला असून प्रमोद बप्पासाहेब मैंदड प्रथम क्रमांक मिळविला तर सायली लाड हिने ९५% घेत द्वितीय क्रमांक मिळवला,तर ऋतुजा मुळे हिने ९४.६०% तृतीय क्रमांक मिळवला आहे. फेब्रुवारी २०२५ च्या एस.एस.सी. परीक्षेसाठी आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल मधून एकूण ३५ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. पैकी ३३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह सह उत्तीर्ण झाले. तर दोन विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. संतोष पा.तांबे, सचिव मानसी नवथर, उपाध्यक्ष विशाल पा. तांबे, प्राचार्य आर. बी. रामावत, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एम. के. कोळगे, डॉ.जे. ई. येवले, सौ.एस. एस. धोकटे, पी. बी. पातकळ, एस. सी. औरंगे, बी.आर. पठाण, आर.पी. बोरकर, ऋषिकेश नवथर, अंबरीश गायकवाड यांनी गुणवंतांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# श्री क्षेत्र त्रिधारा येथील मंदिर परिसराची भाजपाकडुन स्वच्छता



परभणी (प्रतिनिधी)

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती समारोह सोहळ्या निमित्त श्री क्षेत्र त्रिधारा येथील घाट व परिसरातील मंदिरांची भाजपा महानगर शाखेच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.भाजपाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती समारोह सोहळ्या निमित्त पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनात व महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या नेतृत्वाखाली परभणीतील मंदिराची स्वच्छता करण्यात येत आहे. यावेळी श्री क्षेत्र त्रिधारा येथे घाट व मंदिर स्वच्छता मोहीमेचा शुभारंभ ओंकारनाथ मंदिर परिसरात केला. यावेळी ओंकारनाथ मंदिर, दत्त मंदिर, विठ्ठल मंदिर, महादेव मंदिर, शनी मंदिर, मारुती मंदिर, गणपती मंदिर व घाट आदी परिसरात स्वच्छता केली.

यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, प्रदेश कार्यकारणी सदस्य अँड. एन.डी.देशमुख, सरपंच उमाकांत भरोसे, उपाध्यक्ष उमेश शेळके, सचिव डॉ. मनोज पोरवाल, मंडळाध्यक्ष सुरज चोपडे, वैभव शिंदे, नरेश लंगोटे, प्रसाद बुचाले, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रियांका खडके, चिटणीस प्रभावती अन्नपुर्वे, सरचिटणीस बालिका सुरनर, रुपाली ठाकरे, मनीषा जाधव, उषा पाटोळे, सुनिता घुगे, गयाबाई रिक्षे, उद्धवराव माळीपाटील, रंगनाथ भरोसे, दशरथ भरोसे, मुंजाजी भरोसे, दादाराव भरोसे, पांडुरंग जावळे, शिवाजी भरोसे, विनायक भरोसे, बालासाहेब जावळे, व्यंकटी जावळे, रावसाहेब जावळे, माऊली भरोसे, भरत भरोसे, भरत गिनगीने, सतीश भरोसे, सुधाकर भरोसे, पांडुरंग भरोसे, गजानन जावळे, जीवन जावळे, ओंकार भरोसे, करण भरोसे, अर्जुन भरोसे, पार्थ जावळे, दुर्गादास चौधरी आदीसह वृद्ध, महिला व लहान मुलांनीही या अभियानात सहभाग नोंदविला.

# पूर्णा नदीपात्रात नाव उलटली; सुदैवाने जीवितहानी नाही



पूर्णा (प्रतिनिधी)

विवाह सोहळ्यासाठी निळा येथे येणाऱ्या पाहुण्यांची नाव (तराफा) नदीपात्रात उलटल्याची थरारक घटना मंगळवार दि. २० मे रोजी कानडखेड-निळा शिवारातील पूर्णा नदीपात्रात घडली. या दुर्घटनेत सुमारे पाच ते सहा जण सुदैवाने बचावले असून, त्यामध्ये महिला, लहान मुले व दोन दुचाकींचाही समावेश होता.

निळा येथे संभाजी सुर्यवंशी आणि प्रभाकर सुर्यवंशी यांच्या कन्येचा विवाह सोहळा होता. या समारंभासाठी सातेफळ, कात्नेश्वर, आहेरवाडी, नांदेड आदी भागातून पाहुणे येत होते. संक्षिप्त मार्ग म्हणून कानडखेड मार्गे पूर्णा नदी ओलांडण्याचा पर्याय निवडण्यात आला होता. मंगळवारी सुमारे ११.३० ते १२ दरम्यान पाहुणे तराफ्याने नदीपात्र पार करत होते. या वेळी दोन दुचाकींसह पाच-सहा जण नावेत होते. नावेत एकाच बाजूने वजन अधिक झाल्याने नाव काही अंतर जाताच उलटली. अचानक झालेल्या या घटनेमुळे नावेत असलेले सर्वजण थेट पाण्यात कोसळले. काही क्षणात आरडाओरड सुरू झाली. घटनेच्या वेळी नदीकिनारी उपस्थित असलेल्या नागरिकांनी आणि नावाड्यांनी प्रसंगावधान राखत मदतीला धाव घेतली. सर्वजणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. यामध्ये दुचाक्याही पाण्यातून बाहेर काढण्यात आल्या. नाव नदीपात्राच्या मध्यभागी उलटली असती, तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. मात्र, नदीच्या काठाजवळच ही दुर्घटना घडल्याने मोठा अनर्थ टळला.या घटनेची माहिती पोलिस प्रशासनाला देण्यात आली असून, संबंधित अधिकाऱ्यांकडून पुढील कार्यवाही सुरू असल्याचे समजते.



# अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनाची शपथ

परभणी (प्रतिनिधी)


दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी, कर्मचाऱ्यांना दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनाची शपथ दिली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अहिंसा व सहिष्णुतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून सर्व प्रकारचा दहशतवाद व हिंसाचाराचा सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. भारताचे दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांची पुण्यतिथी दहशतवाद विरोधी दिवस म्हणून पाळण्यात येते.

# सलगरा फाटा ते बेटमोगरा रस्त्यावरील नंदगाव पाटी ते कर्णा फाटा दरम्यान चा रस्ता बनला जीवघेणा

**रस्ता दुरुस्त करण्याची सामाजिक कार्यकर्ते भारत सोनकांबळे बेटमोगरेकर यांची सार्वजनिक बांधकाम उपविभागाकडे निवेदनाद्वारे मागणी**

मुखेड/प्रतिनिधी

तालुक्यातील सलगरा फाटा ते बेटमोगरा कडे जाणाऱ्या रस्त्यावरील नंदगाव पाटी ते कर्णा फाटा दरम्यानचा रस्ता अतिशय खड्डेमय झाला असून या रस्त्यावर अक्षरशः खड्डे खडे पडून ह्या रस्त्याची चाळण झालेली आहे, सद्यस्थितीत हा रस्ता प्रवाशांचा जीवघेणा बनला आहे. या रस्त्यावरून वाहतुकीची रहदारी वाढली असून जास्त वजनाच्या गाड्या या रस्त्यावरून जात असल्याने रोड (रस्ता) पूर्णतः उखडून गेला आहे. अवघ्या काही दिवसांनंतर पावसाळा (मान्सून ऋतू) सुरू होईल तेव्हा या रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचून खड्डे भरल्या जातील तसेच या रस्त्यावरील वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होईल त्यामुळे मोठा अपघात होऊन मोठ्या प्रमाणात



जीवित हानी होण्याची दाट शक्यता असल्याने बेटमोगरा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा निर्भीड पत्रकार भारत सोनकांबळे बेटमोगरेकर यांनी दि.२१ मे २०२५ रोजी मा.कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग मुखेड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तात्काळ हा रस्ता दुरुस्त करण्यात यावा अशा आशयाचे निवेदन दिले आहे. तसेच भारत सोनकांबळे यांनी दिलेल्या निवेदनात असेही म्हटले की, सदर दिलेल्या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन सलगरा फाटा ते बेटमोगरा कडे जाणाऱ्या रस्त्यावरील नंदगाव पाटी ते कर्णा फाटा दरम्यानचा रस्ता तात्काळ दुरुस्त करण्यात यावा अन्यथा सार्वजनिक बांधकाम उपविभाग मुखेड कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा ही संबंधित विभागाला निवेदनाद्वारे दिला आहे.

# संबोधीच्या सामुहिक विवाह सोहळा नोंदणीस प्रतिसाद

परभणी (प्रतिनिधी)

संबोधी अकादमीच्या वतीने रविवार, दि. १ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळ्याच्या नोंदणीस मोठा प्रतिसाद मिळत आहे. परभणी येथील महात्मा फुले विद्यालय येथे होणार्या सामुहिक विवाह सोहळ्यास देश विदेशातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मंगल परिणय विधी पुज्य भदंत पय्याबोधी, नांदेड व भिक्खू संघ याच्या हस्ते संपन्न होणार आहे. या विवाह सोहळ्यात आजपर्यंत २५०० पेक्षा अधिक जोडपी विवाहबध्द झालेले आहेत. या विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या जोडप्यास महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत कन्यादान योजनेतंर्गत वीस हजारचे अनुदान मिळणार आहे. तसेच संबोधी अकादमीच्या वतीने वधू-वरांना शुभ्र वस्त्र, सर्वांना सुरुची भोजन, वाजंत्री आदी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत. या विवाह सोहळ्यासाठी नोंदणीला प्रचंड प्रतिसाद मिळत असुन इच्छूकांनी २५ मे पर्यंत संबोधी अकादमी, महाराष्ट्रचे कार्यालय, गाळा क्रं. ६, सुपर मार्केट, कारेगाव रोड, परभणी येथे मो.क्र. ७७९८५४४७८६ यावर संपर्क करावा.वधु-वर नोंदणीसाठी मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण तर मुलाचे वय २१ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे. वयाचा पुरावा म्हणून टी.सी.,/ दहावीची सनद / जन्म प्रमाणपत्र यापैकी एक, चार पासपोर्ट फोटो, वधू किंवा वर यापैकी किमान एका जणाचे जातीचे प्रमाणपत्र, वधु-वराचे रहिवाशी प्रमाणपत्र नोंदणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी अविनाश मालसमिंदर-७७९८५४४७८६, यांच्याशी संपर्क करावा. सदरील विवाह सोहळ्यात जास्तीत जास्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन विवाह सोहळयाचे आयोजक संबोधी अकादमीचे अध्यक्ष समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे, भगवानराव जगताप, डॉ. अरविंद सावते, शेषराव जल्हारे, सिध्दार्थ भराडे, गौतम साळवे, भीमराव पतंगे, शशिकांत हत्तीअंबीरे, बबन शिंदे, बाळासाहेब अंभिरे, डॉ. लक्ष्मण कांबळे, मुरलीधर ढेंबरे, ड. सुनिल बगाटे, बाळासाहेब किर्तने, विश्वनाथ डबडे, दि.फ. लोंढे, नवनाथ पैठणे, माधव मोते, गौतम कठाळे, राजेश चांदणे, एल.आर. कांबळे, भीमराव धबाले, राजेश पंडीत, बाबासाहेब भराडे, संतोष भराडे, संभाजी खिल्लारे, गंगाधर परसोडे, धनंजय रणविर, सोनाजी लांडगे, बाबासाहेब भुजावळे, दिपक जाधव, हेमंत घुगे, साहेबराव ढगे, उत्तम साळवे, अरुण पंचांगे, एकनाथ खंदारे, डॉ. नामदेव मुळे, प्रभाकर कांबळे, भीमराव श्रीखंडे, बंडू नरवाडे, सुर्यकांत उजगरे, सुरेश मगरे, बाबुराव गवळी, रोहिदास साखरे, गोमाजी श्रावणे, पवन कांडलीकर यांनी केले आहे.

# पूर्णा शहरात तिरंगा बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद



पूर्णा (प्रतिनिधी)

देशभक्तीने भारलेल्या वातावरणात बुधवार दि. २१ मे रोजी शहरात तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरमधून देशासाठी पराक्रम गाजवणाऱ्या भारतीय सैन्याच्या शौर्याला सलाम करण्यासाठी शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

रॅलीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास माजी सैनिकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मातृभूमीसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सैन्याच्या सन्मानार्थ नागरिकांची एकात्मता आणि दृढ पाठिंबा या रॅलीतून ठळकपणे दिसून आला. कार्यक्रमात माजी सैनिक गणेशभाऊ कदम, मन्नूसिंह ठाकूर, शंकर डहाळे व सोमनाथ काकडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. रॅलीत लक्ष्मीकांत (बाळू) कदम, डॉ. अजय ठाकूर, नितीन कदम, हरिभाऊ कदम, हनुमान शेठ अग्रवाल, राजेश भालेराव, दयाल ओझा, एकनाथ काळबांडे, विष्णू प्रताप कदम, अनंतराव पारवे बळीराम कदम, गोविंद ठाकर, प्रशांत कापसे, सुनील डुबीवार, राजेश धूत, राम पुरी, नाना चिटणीस, भारत ऐकलरे, बाबा ठाकूर, प्रभाकर कोर्टावर, राजू महाजन, गजानन कदम, अबनराव पारडे, संतोष पळसकर, गोविंद ठाकूर, विश्वनाथ होळकर, निलेश आगलावे, ईश्वर ठाकूर, किशोर सूर्यवंशी, हर्षल महाजन, अनिल बागल, जयसिंग चंदन, सदानंद पारडे आदी देशभक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या प्रेरणादायी तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन लक्ष्मीकांत कदम व गोविंद राज ठाकर यांनी केले होते.

# अवैध देशी दारू विक्रीवर पोलिसांची कारवाई

ताडकळस/प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या मुंबर येथे अवैध देशी दारू विक्री वर पोलिसांनी कारवाई करत देशी दारू विक्रेत्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याचे घटना रविवार (दि. १८) रोजी घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, ताडकळस पोलीस ठाणे हद्दीतील मुंबर येथे अवैध देशी दारू विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली यावरून मुंबर परिसातील पाण्याच्या टाकी परिसरात रविवार सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास रोजी आरोपी संग्राम पिराजी शिंदे(वय ५०) रा. मुंबर ता पुर्णा याच्या ताब्यातून देशी दारूच्या सुमारे ९१० रुपये किमतीच्या १३ बॉटल्स जप्त करण्यात आले आहेत.

याप्रकरणी पोलीस हवालदार वेदप्रकाश गंगाधर भिंगे यांच्या फिर्यादीवरून ताडकळस पोलीस ठाण्यात अवैध देशी दारू विक्री प्रकरणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनात पोलिस हवालदार वडजे हे करीत आहेत.





# काझी मुशाहेद व अफशा फातेमा यांचे तालुकास्तरीय स्पर्धेत उज्वल यश पात्रुड माजलगाव शाळेचा गौरव

**प्रतिनिधी @ अंबाजोगाई**

बीड जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई व जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ मध्ये पात्रुड (ता. माजलगाव) येथील शिक्षक काझी मुशाहेद व शिक्षिका अफशा फातेमा यांनी विशेष यश संपादन करून आपल्या शाळेचा आणि बीड जिल्ह्याचा मान उंचावला आहे.

या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांतील अनेक शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत दर्जेदार आणि प्रभावी शैक्षणिक व्हिडिओ सादर करून काझी सर व फातेमा मॅडम यांनी परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांना या उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.या यशामुळे शाळेतील विद्यार्थ्यांसह संपूर्ण शिक्षकवर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांना नवकल्पनांचा उपयोग करून शिक्षण देण्याच्या दृष्टीने या दोघांचे काम प्रेरणादायी ठरत आहे.पात्रुड येथील जि.प. शाळेचा हा गौरवपूर्ण क्षण असून, या यशाबद्दल दोघांचेही सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# कोरडेवाडी येथील अशोक यादव विरुद्ध बालविवाहाचा गुन्हा नोंद

**प्रतिनिधी @ केज**

अडीच वर्षांपूर्वी अल्पवयीन मुलीसोबत बालविवाह केल्या प्रकरणी कोरडेवाडी येथील अशोक बारीकराव यादव याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात बालविवाह आणि बाल लैंगिक अत्याचार कायद्याच्या कलमांनुसार मंगळवारी रात्री ११ वाजता गुन्हा नोंद झाला आहे..

बीड तालुक्यातील पिंपरनई येथील अल्पवायीन पीडित मुलीचा बालविवाह आई, वडील व नातेवाईकांनी नोव्हेंबर २०२३ मध्ये अशोक बारीकराव यादव रा कोरडेवाडी याचे सोबत झाला होता. दरम्यान पीडित अल्पवायीन मुलगी गरोदर राहिल्या नंतर रविवारी ( दि १८ ) तिच्या पोटात दुखु लागल्या मुळे सासरच्या मंडळींनी तीला नेकनूर येथील शासकीय महिला रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आसता, या महिलेची रुग्णालयात प्रसूती झाली व तीला मुलगा झाला. दरम्यान उपचार करणारे वैद्यकीय अधिकारी डॉ मसुरे यांनी महिलेच्या नातेवाईकां कडे आधार कार्डची मागणी केल्या नंतर या पीडितेचा बालविवाह झाल्याचे डॉकटच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी ही माहिती नेकनूर पोलिसांना कळविली. अडीच वर्षांपूर्वी हा बालविवाह केज तालुक्यातील कोरडेवाडी येथे झाल्यामुळे ही माहिती केज पोलिसांना देण्यात आली. त्या नुसार केज पोलिसात पीडित अल्पवईन मुलीचा पती अशोक बारीकराव यादव रा कोरडेवाडी याचे विरुद्ध बालविवाह आणि बाल लैंगिक अत्याचार कलमान्वये गुन्हा नोंद झाला आहे. पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत. पीडित अल्पवायीन महिला व बाळ हे नेकनूर येथील रुग्णालयात सुखरूप असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ मसुरे यांनी बोलताना दिली.

## सहाय्यक वाहतूक परिवहन अधिकारी वर्ग १ पदी (एआरटीओ) निखिल धांडगे ची निवड

**प्रतिनिधी @ अंबड**



घनसावंगी तालुक्यातील राहेरा गावचा शेतकऱ्याचा मुलगा निखिल प्रभाकर धांडगे याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) २०२३ च्या परीक्षेत चांगले यश मिळून सहाय्यक वाहतूक परिवहन अधिकारी वर्ग १ (एआरटीओ) या पदावर निवड झाली आहे.त्यांनी खूप मेहनतीने व जिद्दीने हे पद मिळवलेले आहे तरी त्यांचे अभिनंदन सर्व स्तरातून होत आहे त्यांचे वडील प्रभाकर धांडगे,भाऊ डॉक्टर रवी धांडगे,दिपक धांडगे,चेतन धांडगे व त्यांचा मित्रपरिवार वनपरिक्षेत्र अधिकारी अभय अटकळ, उद्योजक विजय काळे,डॉक्टर आबासाहेब शिंदे,अमोल फोके,कैलास खोजे,डॉक्टर चक्रधर देवडे,गणेश सपकाळ सर,डॉक्टर प्रसाद काकडे, अमोल कासोदे,आबासाहेब धांडगे,तुषार वाडेकर,गणेश जाधव,प्राध्यापक मकरंद वाकडे,रवी मुळे,दत्ता शिराळे,अतुल गावंडे,राजू शिंदे,श्रीकांत सुरडकर,संतोष तौर,दत्ता बनसोड,डॉक्टर अतुल थोरे,विष्णू जाधव,भारत सुबुगडे, महेंद्र विरकर,महादेव आरगडे, दिपक कावळे,कपिल उबाळे, श्रीकांत कोकीळ,नयन क्षिरसागर,बद्री जाधव,मुकुंद राऊत,दत्ता कुंडकर आदींनी व गावकऱ्यांनी त्यांच्या शिक्षक वृंदांनी त्याचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेतकऱ्यांना बियाणे, खते याचा कुठलाही तुटवडा पडणार नाही- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**प्रतिनिधी @ मुंबई**

राज्यामध्ये आवश्यक तेवढा बियाण्याचा पुरवठा आणि आवश्यक तेवढे खत उपलब्ध आहे. बियाणे, खते याचा कुठलाही तुटवडा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पडणार नाही. साधारणपणे मागील वर्षांचा कल पाहता कुठले पीक कुठे कमी-अधिक प्रमाणात घेता येईल, याचा विचार करूनच त्या ठिकाणी बियाण्याची उपलब्धता करून देण्यात आलेली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली.

आज मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे कृषि विभागाच्या राज्यस्तरीय खरीप हंगाम नियोजनाची आढावा बैठक मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या खरीप हंगाम आढावा बैठकीची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. या पत्रकार परिषदेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, कृषी मंत्री ड.माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, प्रधान सचिव प्रविण दराडे, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी तसेच कृषी आयुक्त सुरज मांढरे उपस्थित होते.

**बोगस बियाण्यांवर आळा घालण्यासाठी 'साथी' पोर्टल**

मुख्यमंत्री म्हणाले की, बोगस बियाण्यांवर आळा घालण्यासाठी महाराष्ट्राने पहिल्यांदा केंद्र सरकारच्या 'साथी' या पोर्टलवर बियाणे नोंदणी करण्याचा नियम केला आहे. या नोंदणीमुळे हे बियाणे ट्रेसेबल होणार आहे. दुर्दैवाने राज्यांमध्ये जे बियाणे विकलं जाते, त्याच्यापैकी ७५% बियाणे हे बोगस असून ते उत्पादकांनी तयार केलेले नसते. त्यामुळे या वर्षीपासून हे सर्व प्रकारे बियाणे 'साथी' या पोर्टलवर आणायचा निर्णय घेण्यात आला असून त्यास केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. आता जवळपास ७० हजार क्विंटल बियाणे पोर्टलवर उपलब्ध असून ते ट्रेसेबल आहे. त्यामुळे याच्यामध्ये बोगसगिरी झाली तर तर कोणामुळे झाली हे लक्षात येऊ शकणार आहे. पुढच्या वर्षीपासून १००% बियाणे 'साथी' या पोर्टलवर असेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**खतांचे लिंकिंग आवश्यक**

खतांच्या बाबतीत लिंकिंगची तक्रार सातत्याने येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, लिंकिंग संदर्भात अतिशय कडक अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला आहे. आता प्रत्येक कृषी केंद्राच्या बाहेर लिंकिंगच्या संदर्भातला बोर्ड लावून त्यावर फोन नंबर देण्यात येणार आहे. त्यामुळे लिंकिंगचा कुठे आग्रह झाला तर त्यासंदर्भात त्या नंबरवर फोन केल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, हेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. एखाद्या कृषी केंद्रांनी पुरवठादार कंपन्याच्या सूचनेवरून लिंकिंग केले नाही, अशा वेळी एसेंशिअल कमोडिटी क्ट किंवा तत्सम कायद्याच्या अंतर्गत त्यांच्यावर कारवाई केली जाईल, अशा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला.

**किड व्यवस्थापनासाठी डिजिटल शेती शाळा**

कीड व्यवस्थापन योग्य प्रकारे झाले पाहिजे, या दृष्टीने सगळी काळजी घेण्यात येत आहे. विशेषतः यावर्षी डिजिटल शेती शाळा या देखील आयोजित करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक तालुक्यामध्ये डिजिटल शेती शाळा आयोजित करण्यात येणार आहेत. या डिजिटल शेती शाळेच्या माध्यमातून कीड व्यवस्थापनबरोबरच चांगल्या नवीन पद्धतीचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र - 'महाविस्तार' प**


कृषी विभागाने एआय बेस्ड 'महाविस्तार' हे मोबाईल प लॉन्च केले असून या पवर शेतीच्या संदर्भातली सगळी माहिती आणि व्हिडिओज उपलब्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना शेतीतील कुठलाही प्रश्न आला, कुठली लागवड करायची आहे, त्याची काय पद्धती आहे, कुठले कीड व्यवस्थापन करायचे आहे, त्याची काय पद्धती आहे, काय वापरले पाहिजे, कुठल्या स्टेजवर काय वापरले पाहिजे, अशी सगळी माहिती, त्याचे व्हिडिओज त्या पमध्ये असल्याचे त्यांनी सांगितले. या पमध्ये मराठी भाषेत चॅटबॉट असून त्यावर कुठलाही प्रश्न विचारला असता त्याला योग्य उत्तर मिळते. असा हा शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईल डाऊनलोड करून शेतीसंदर्भातील सर्व माहिती मिळवावी, असे आवाहन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.


**सिबिल अट नाही**

शेतकऱ्यांना योग्य प्रकारे कर्ज पुरवठा झाला पाहिजे, या संदर्भात बँकांना सांगितले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. एसएलबीसीच्या प्रमुख बँकांनी सिबिलची अट ठेवणार नसल्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे एखाद्या बँक शाखेत जर सिबिलची मागणी करण्यात आली, तर त्या शाखेवर कारवाई करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना वेळेत पतपुरवठा झाला पाहिजे, याकडे आमचे संपूर्ण लक्ष असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सूचित केले.

शेवटी मुख्यमंत्री म्हणाले की, वातावरणातल्या बदलामुळे काही डिझॅस्टरची सूचना आधीच मिळावी यासाठी आयएमडीच्या मदतीने एक डिसिमिनेशनची सिस्टीम देखील तयार केली असल्याचे त्यांनी सांगितले.

## कै.डॉ.भाऊसाहेब देशमुख विद्यालयाचा निकाल शंभर टक्के




### उज्वल यशाची परंपरा कायम

**प्रतिनिधी @ मुक्रमाबाद**

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील कै.डॉ.भाऊसाहेब देशमुख विद्यालयाचे उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे .या वर्षी एस.एस.एसी.बोर्ड माध्यमिक शालांत परीक्षा २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाली असून.कै.डॉ.भाऊसाहेब देशमुख विद्यालयातील विध्यार्थी १.केरुरे संजय चंद्रकांत ९४.२० % घेऊन शाळेतुन सर्व प्रथम २.बनसोडे जिजाई अशोक ९२.००% शाळेतुन द्वितीय ३.भासवाडे दिक्षा व्यंकटराव ९१.००% शाळेतुन त्रतीय ४.बामणे मनोरमा संतोष ९०.८०% ५.आवळे अनुराधा मष्णाजी ९०.६०% शाळेचा एकूण निकाल १०० % सेमी इंग्रजीचा निकाल १०० विद्यार्थी एकूण १०२ विद्यार्थ्यांपैकी १०२ विद्यार्थी उत्तीर्ण सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव मा. रामरावजी भोसले, प्रा. सतिष नलवाडे प्रा. आशुतोष पाटील, मुख्याध्यापक बी.एस. मोरे, शिवकुमार बोधने, घोणशिकर सर, राजू भोसले, के. व्ही. जाधव, परगे सर, काळे सर, राठोड सर, बनवा सर, बिरादार मॅडम, पाटील मॅडम, भंगे मॅडम, भाले मॅडम, तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सेवक पत्रकार बांधव यांच्यासह गावातील अनेक मान्यवरांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

## भाजपा उत्तर मध्य जिल्हा मुंबईच्या वतीने ऑपरेशन सिंदूर भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन

**प्रतिनिधी @ मुंबई**




सांताक्रूझ रेल्वे स्थानक पुर्व ते मिलिटरी कॅंप वाकोला अशी भव्य तिरंगा ऑपरेशन सिंदूर यात्रा जिल्हा अध्यक्ष विरेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मुंबई अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे मंत्री आशिष शेलार यांनी म्हणाले की, भारतीय सैनिकांनी पाकिस्तान मध्ये घेऊन आतंकवादीचे सर्व अड्डे उध्वस्त केले याचे जगभरात भारतीय सैनिकांचे कौतुक म्हणून भारतीय नागरिकांमध्ये उत्साह तिरंगा यात्रा भारतीय सैनिकांना सलाम देण्यासाठी आहे.

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सगळ्या भारतीय सिमेवर दाखविलेल्या विस्वास दिलेली सुट आणि राजनैतिक सेवा केलेल्या निर्णय त्यामुळे मोदींच्या नेतृत्वावर हे यश आ ऑपरेशन सिंदूर आपल्या भारतीय सैनिकांनी मिळविले आहे.या सर्वांच्या मागे भारतीय नागरिक उभे आहेत. या भावनेने समस्त प्रत्येक विभागांमध्ये तिरंगा यात्रा निघत आहेत. आज या ठिकाणी मी आमदार पराग अळवणी, जिल्हा अध्यक्ष विरेंद्र म्हात्रे, सुषम सावंत, सुहास आडिवरेकर, महेश पारकर आणि सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यामुळे हि यात्रा सफल झाली.

## कॉंग्रेसच्या वतीने बीड मध्ये तिरंगा रॅली संपन्न !

**प्रतिनिधी @ बीड**

पाकिस्तानच्या सततच्या भ्याड हल्ल्याला भारतीय सैन्याने मोठ्या ताकतीने उत्तर देत पाकिस्तानला चार दिवसांत गुडघे टेकायला लावले व भारतीय सैन्याने मिळवलेला हा विजय केवळ सैन्याचा आहे म्हणून भारतीय सैन्याला सलाम करण्यासाठी व भारतीयांची असलेली संवेदना हिच खरी देशभक्ती असून या वीरांच्या पराक्रमाला वंदन करण्यासाठीच कॉंग्रेस पक्षाच्या वतीने तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते.



**मोटार सायकल रॅली काढून सैनिकांच्या प्रति कॉंग्रेसने दाखवली सद्भावना**

बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून या रॅलीची सुरुवात कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हाधिकारी कार्यालय समोरून जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे कार्यालयात शहीद जवानाच्या प्रति संवेदना व केलेल्या शौर्याला सलाम व्यक्त करत या रॅलीचा समारोप करण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रवीणकुमार शेप, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेदरे, परवेज कुरेशी, संभाजी जाधव, गणेश राउत, विष्णू मस्के, प्रकाश मुंडे, पांडुरंग मस्के, दादासाहेब तासतोडे, राहुल जाधव, ड. विशाल मस्के, रमधन जमाले, मोसिन शेख, गणेश जवकर, कल्याण टेकाळे, हनुमंत घोडके, शेख कादर बाबा, उत्तरेश्वर जाधव, बबलू भाई शेख, रोहित नवले, राम शेळके, हरिभाऊ सावंत, पांडुरंग हराळे, सखाराम बेंडगे, रंजीत शेळके, अमजत कुरेश, शेख मुस्ताक, बाळू गिराम यांच्यासह या रॅलीत बीड शहर मंचचे नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, डॉ. संजय तांदळे, अड. नितीन वाघमारे यांनी देखील उपस्थित राहून भारतीय सैनिकांप्रती आपल्या संवेदना दर्शवल्या.

स्व. राजीव गांधी यांना अभिवादन...!आज भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न स्व राजीव गांधी यांचा स्मृतिदिन असल्याने जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या सह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सर्दी तर होणारच ना...!

**पावसाळा आला की पावसाळी छत्र्या येणारच असं मराठीत गंमतीने म्हटलं जातं आणि ते देखील खरच आहे. जंगली मशरूम अर्थात पावसाळी छत्री या आशयाने इथं अर्थ घेतला जात असतो. मात्र येणाऱ्या पावसासोबत ज्या काही गोष्टी समोर येतात त्यात पावसाळ्यात होणारे आजार अर्थात साथरोग देखील येऊ शकतात आणि साथरोगाची ही आपत्ती रोखली नाही तर मोठा गोंधळ निर्माण होतो.**

**पावसात भिजल्यानंतर सर्दी होणे हे अगदी सहाजिक आहे. प्रत्येक वेळी आपण छत्री अथवा रेनकोट घेऊन फिरत नाही आणि अनेकदा वाहनाच्या डिक्कीतला रेनकोट परिधान करेपर्यंत आपण भिजलेलो असतो. लहान बालकांची प्रतिकारशक्ती तुलनेत कमी असली तरी त्यांना याचा धोका कमी आहे. मात्र तथापि दुसऱ्या बाजूस घरातून पालकांकडून याचा प्रसार होऊ शकतो.**

**साधारणपणे सर्दी-पडसे हा पावसाळ्यातील सवयीचा आजार आहे आणि त्यावर मुख्यतः घरगुती इलाज होताना दिसतात. स्वतःहून औषधे घेणे आणि मुलांना देणे असे प्रकार प्रचलीत आहेत. अनेकदा टि.व्ही. वरील जाहिराती बघुनही औषधे घेतली तसेच दिली जाताना दिसतात परंतु नेमकेपणाने निदान करून मगच औषधे घ्यावीत हे उत्तम.**

विविध प्रकारच्या औषधांचा स्वतःहून वापर करणे कुणासाठीही धोकादायकच म्हणावे लागेल कारण या औषधांचे चांगले परिणाम होवून आजारातून बरे होता येईल ही अपेक्षा असते. मात्र या प्रकारच्या औषधांचे दुष्परिणाम काय होतात याची माहिती नसल्याने त्याचा उलटा परिणाम होवू शकतो. आरोग्यासाठी हा धोका पत्करू नये.आपल्याकडे निष्काळजीपण, दुर्लक्ष करणे आणि दुखणे अंगावर काढणे असेही प्रकार दिसून येतात. यातूनही आजारपण वाढू शकते. त्यामुळे आजारी पडल्यावर न चुकता वैद्यकीय सल्ला घेणं केव्हाही उत्तम.आपले शरीर मुख्यत्वे पाण्यावर अवलंबून असते. आणि पावसाळ्यात जे आजार आढळून येतात त्यापैकी साधारण ७० टक्के, आजार हे पाण्यामुळे होतात. त्यात पाण्यातील जिवाणुंमुळे होणारे आजार वेगळे आणि विषाणुंमूळे होणारे आजार वेगळे आहेत. या सर्वांचे मुळ अर्थात पाणी हेच आहे.

पावसाळ्यात अनेक विषाणू सक्रिय होतात. त्यामुळे शुद्ध पिण्याचे पाणी हा आजारांना दूर ठेवण्याचा सर्वोत्तम उपाय आहे. पावसाळ्यात अनेक ठिकाणी जलसाठे दुषित होतात. त्यामुळे आजारांचा धोका वाढत असतो. घरात पिण्याचे पाणी उकळून ते थंड करून घेणे चांगले. पाणी उकळल्याने त्यातील सर्व जिवाणू, विषाणू मरतात. त्यामुळे ज्या ठिकाणी शुद्ध पाणी नाही त्या ठिकाणी पाणी उकळूनच प्यावे.

पाण्यातील अशुध्दपणा दूर करण्याचा आणखी एक उपाय म्हणजे तुरटीचा वापर करणे होय. बाजारात तुरटी



सहजरित्या उपलब्ध असते. कोणत्याही किराणा दुकानात ती आपणास खरेदी करता येईल. पाण्यात तुरटी फिरविल्यास गाळ खाली बसेल नंतर त्याचा वापर करता येईल.

पाण्यात तुरटी फिरवणे सर्वच अर्थाने आपल्या आरोग्यासाठी सहाय्यकारी ठरणार आहे. तुरटीच्या पाण्याने अंघोळ केल्यास त्वचेवर होणारा संसर्ग कमी